

# श्री साईलीला

ोव्हेंबर किं. ५० न. पैसे १९६२

स्थापना १९१६




सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जिनेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. ६९६३१



# श्री साई वाक्सुधा

फार दीर्घ प्रयत्न करूनही जें इतरांस साध्य होत नाहीं, तें जो कोणी निष्ठापूर्वक सद्गुरूची कास धरील तो अल्पायासें साध्य करून घेईल. जेथें स्वार्थ नसतो, त्याची नावनिशाणीही रहात नाहीं; केवळ जो परार्थासाठीं या जगांत वावरतो तेथें त्याच्या अंतःकरणांत सच्चिदानंद स्वरूप स्थिरावतें. मीच सच्चिदानंद याची त्याला जाणीव होते. मोक्ष मोक्ष म्हणतात तो यापेक्षां वेगळा का आहे ? मानवी जीवानें ज्यासाठीं धडपड करावयाची व ज्याच्या प्राप्तीसाठीं जीवनभर यातायाती करावयाच्या तें प्राप्तव्य पदरीं पडल्यानंतर मिळवायचें असें कांहींच शिल्लक रहात नाहीं. सद्गुरू कृपेचा महिमा मोठा आहे.

— श्रीसाईसच्चरित्


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४२ वें ] नोव्हेंबर १९६३ [ अंक ८ वा

: संपादक :

श्री. श्रीपाद बाळकृष्ण दर्प

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ६३३६१

: कार्यालय :

साई निकेतन,' डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०, बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

नाम महिमा आजवर अनेकांनीं गायिला आहे; परंतु श्रद्धायुक्त अंतःकरणानें रामनाम किंवा ज्या नांवावर आपली अगाध श्रद्धा आहे असें कोणाही मनुष्याचें नांव असो. तें श्रद्धेनें घ्यावयाचें म्हणजे त्याचें फळ कधींना कधीं मिळावयाचेंच. देव आमच्या अंतःकरणाचा निर्मळपणा पहातो. पावित्र्य संभाळणें आमच्याकडून कुठवर घडत आहे; आम्हीं अंतर्बाह्य निर्मळ झालों आहोंत कीं नाहीं हें डोळ्यांत तेल घालून पहात असतो. तें पावित्र्य अंगी बाणायला कालावधि लागतो. आमच्या सभोंवार आमचे अनेक शत्रू टपून बसलेले आहेत. त्यांतून आम्हांला मार्ग चोखाळावयाचा असतो.

आपण प्रवासास निघालों म्हणजे चोरांचें भय असतें. त्यांच्यापासून सावधगिरीनें रहावयाचें. कोणी केव्हां व कोणत्या परिस्थितींत हल्ला करील व लुबाडील याचा नेम नसतो. या जगांत दुष्टांचें वास्तव्य फार मोठ्या प्रमाणांत आहे. त्यांच्यापासून स्वतःचें रक्षण करावयाचें असतें. त्यासाठीं आपण जरूर ती खबरदारी घेतोंच कीं नाहीं?

त्याचप्रमाणें क्षणोक्षणीं आपल्या मनांत नाना प्रकारचे विचार जागे होतात. ते सारेच कांहीं कल्याणप्रद असतात असें नाहीं. दुष्ट विचारांना अंतःकरणांत थारा द्यावयाचा नाहीं, हल्ला होण्याच्यावेळीं दक्षता बाळगावयाची असते. एकदां का मनानें दुष्ट स्वार्थी मत्सरी व आसुरी विचारांनीं अंतःकरणाचा ताबा घेतला म्हणजे आपण हतबल होतों. त्या विचारांपुढें शहाणपण चालेनासें होतें. त्यांना आपला पगडा बसवूं द्यावयाचा नाहीं. त्या ऐवजीं स्वतःच्या व दुसऱ्यांच्या कल्याणाच्या विचारास थारा द्यावयाचा हे एक प्रकारचें तप आहे. त्या तपासाठीं जागृत रहावयाचें. मनाला सुविचारांची संवय लावावयाची. त्यासाठीं दीर्घकाल लागत असतो.

सज्जनपणा सात्वीकता अंगीं एकाएकी येत नाहीं. त्यासाठीं वर्षें, दोन वर्षें, बारा वर्षें नव्हेत तर सारा जन्महि खर्ची घालावा लागतो. परंतु तें संधान साधण्यासाठीं अहर्निश प्रयत्नशील व्हावें लागतें.

आणि या उद्योगांत असतां मनुष्यमात्राला नामसंकीर्तन फार उपयोगी ठरत असतें. आपण सुलभ असें रामनामच घेऊ या. त्या दैवी नांवाला कितीतरी चांगल्या गोष्टी चिकटलेल्या आहेत. त्या नांवाच्या उच्चाराबरोबर या जगांत चांगलें, उपकारक व कल्याणदायक म्हणून जें जें कांहीं आहे त्याच्या पुण्यस्मरणानें आपलें अंतःकरण भारावून जातें. आणि सतत तोच एकमेव ध्यास घेतल्यानें त्या नांवामागें जें पावित्र्य, जें सौजन्य जी सच्छीलता व जो सात्वीकपणा आहे, त्याचा अंशभाग आपल्या ठायीं जागा व्हायला लागतो.

नुकतेंच ईशरूपीं विलीन झालेले स्वामी रामदास यांचा जीवन परिचय या अंकांत अगदीं थोडक्यांत करून देण्यांत आला आहे. रामनाम हेंच त्यांचें सर्वस्व होतें. त्यांच्या वडिलानी रामनामाचा मंत्र त्यांना दिला आणि तो पवित्र मंत्र त्यांनीं केवळ ऐकला एवढेच नव्हे तर जीवनभर तो मंत्र अहोरात्र त्यांनीं आचरणांत आणिला.

आपल्या आयुष्यांत त्यानीं हालअपेष्टा, तापत्रय व संकटें पुष्कळ भोगलीं. परंतु कोणत्याहि प्रसंगीं त्यांनीं रामनामाची व आपली ताटातूट होऊं दिली नाहीं. तेंच सर्वस्व मानिलें; तोच ठेवा व सुखाचा खजिना मानिला. त्या नामाच्या बळावर ते सर्व संकटांच्या पलिकडे जाऊं शकले. त्यांना सर्व प्राणिमात्र रामस्वरूप वाटूं लागले. ते राममय झाले !

जीवनांत मिळावयाचें असें त्यांना कांहीं शिल्लक राहिलें नाहीं. सर्व सुखें त्यांच्या पायावर लोटांगणें घेऊं लागली. या जगांत जन्म घेऊन जी वैभवश्री प्राप्त करून घ्यावयाची ती सारी त्यांच्या वांट्याला आली.

त्यांचे ऊर्वरित जीवन केवळ परोपकारार्थ होतें. ' तुका म्हणे उरलों आतां परोपकारापुरता ' अशी त्यांची स्थिति झालेली होती. केवल्या वैभवांत स्वामी रामदासानी इहलोकाचा निरोप घेतला ! त्यांना रामनामाच्या बळावर प्राप्त झालेलें ते वैभव खरोखर आगळें होतें.

आधुनिक स्वामी रामदास यांची रामनामावर श्रद्धाच तशी होती ! ती असीम श्रद्धा तुमच्या आमच्या वाट्याला कां बरें येऊं शकणार नाहीं ? परंतु तेवढा कणखरपणा तेवढा निर्धार आमच्यापाशीं आहे का ? त्यानीं देवाशीं सख्यत्व जोडतां यावें म्हणून जसा सर्वस्वाचा त्याग केला ती वृत्ति आमच्याठायी आहे का ? याचा आपण विचार केला पाहिजे.

त्यांच्याप्रमाणें किंवा इतर अनेकांप्रमाणें प्रत्येक माणसानें कुटुंबाचा किंवा घरादाराचा त्यागच केला पाहिजे असें नाहीं. आणि तसें घडणें प्रत्येकाचे बाबतींत शक्य व इष्टहि नाहीं. या संसारांत आपल्या कुटुंबांत राहूनहि रामनामाच्या बळावर आम्हांला आमचा व इतरेजनांचा उद्धार करून घेणें शक्य आहे.

संसारांतील सुखदुःखें भोगीत असतांहि आपण त्यापासून अलिप्त राहूं शकतों. आनंद, अगदीं उच्च प्रतीचा आनंद उपभोगूं शकतों.

साईबाबानी नाममहात्म्य परोपरीनें गायिलें आहे. त्यानीं सोप्या व स्पष्ट शब्दांत सांगितलें आहे कीं—' जेथें रामनामाचें गर्जन । फिरे तेथें विष्णूचें सुदर्शन ॥ करी कोटी विघ्नांचें निर्दाळण । दीन संरक्षण नाम हें ॥ '

एवढा रामनामाचा महिमा आहे, तो आपण ओळखावा व आपल्या जीवनांत त्याचा पदोपदीं अनुभव घ्यावा. श्री साईबाबांच्या शिकवणीचें हें मर्म आपण ओळखूं या. आणि आपलें सारें जीवन उजाळून सोडूं या.

—संपादक




## विवेकें करावें साधन

**श्री.** पु. वा. मोहोड, कुरण पूर्णा, जि. अमरावती हे लिहितात कीं,

मला श्री साईनाथांचा नुकताच साक्षात्कार वजा चमत्कार झालेला आहे तो बाबाबद्दल आणखी श्रद्धा व भक्ती निर्माण करण्याच्या हेतूनें प्रकाशनार्थ माझ्या मोडक्या तोडक्या शब्दांत देत आहे.

माझी राम डोंगरी येथील नोकरी अन्य कारणानें कां होईना, सुटल्यानुळें मी फार बेचैन झालों होतों घरची परिस्थिती अत्यंतच नाजूक. नोकरी मिळविण्याकरतां अनेक मानवी प्रयत्न करून थकलों व शेवटीं बाबांकडे धांव घेतली. संत पुरुषाकडे काय मागावें हेंहि कळेना. "देवा, मला काय हवें हें तुला माहित आहे व मी कोणत्या तुझ्या वरास पात्र आहे हेंहि तूं जाणतोस." असें मी म्हणे, पण आपल्यास नोकरी मिळावी असें वाटे. त्यानंतर केवळ तीन महिन्यांतच मला माझ्या भावाच्या कामाकरितां नागपूरला जावें लागलें. तेथें माझ्या एका श्री खान मित्राजवळ गोष्ट काढली. आणि काय नवल फक्त १० मिनिटातच २२–६–६३ ला शकरदरा माईन्स मॅनेजरची ऑर्डर हातीं मिळाली. त्याच दिवशीं कामावर जायचें. मी बुचकळ्यांत पडलों. घरी जायचें शेतीची कामें कोणाला तरी समजून द्यायचीं. घर तर १५० मैल. शेवटीं ३ दिवस मुदत मागून घेतली व मी माझ्या सासुरवाडीस वर्धेजवळ आलो. तेथें माझे वडील व मुलें होतींच, त्यांना समजाऊन सांगितलें व मिळेल ती भांडी व सामान घेऊन निघालों. आपणाजवळ फोटो श्री गजानन विजय वगैरे कांहींच नाहीं याचें मला वाईट वाटे. मी साई महाराजांना गजाननांच्या नावेंच ओवाळतो व साईंच्या फोटो-जवळ गजानन महाराजांचीच आरती म्हणतो. शेवटीं मी तिरोडीला शाद आणि कंपनी–तिरोडी येथें आलों. तों काय नवल ? शाद या मुसलमान गृहस्थाच्या दिवाण-खान्यांत पोहोंचताच माझें प्रथम लक्ष गेले ते श्री साईनाथ यांच्या भव्य फोटोकडे ! माझे डोळे पाणावले, हृदय भरून आलें. भक्तिभावानें नमस्कार केला. आरती केली

नि झोपलों. दुसरें दिवशीं शकरदरा माइनवर जायचें, आपल्याजवळ साईंचा किंवा गजानन महाराजांचा फोटो नाहीं याचे वाईट वाटत होते पण परदेशांत फोटो कुणाजवळ मागायचा ! पण ही अडचण देखील महाराजांनीं दूर केली. ऐन निघायच्या वेळेस पुणेकर आले आणि म्हणाले ' मोहोड हा साई महाराजांचा फोटो घ्या व तो माइन ऑफिसमध्यें लावा ' मला तरी काय पाहिजे होतें ? मला पुजेला फोटो मिळाला. बाबा अजूनहि आपले केवळ स्मरण करणाराचे किती लाड पुरवितात हें यावरून स्पष्ट होते. मला एक स्वप्न पडलें त्यांत मी अनिती करीत होतों पण ऐनवेळीं बाबा दार उघडून आले व ' विवेक करावे साधन ' असें कानांत सांगून गेले. माझे स्वप्न भंगले पण ते शब्द अजूनहि लक्षांत आहेत. आणि हाच माझा गुरुमंत्र.

दूर कां होईना पण बाबांच्या कृपेनें नोकरी मिळाल्यामुळें मुलांच्या शिक्षणाची सोय व शेतीच्या लागवडीस हातभार लावण्याचे सामर्थ्य आले आहे हे मात्र निश्चीत.

× × × ×

## हें श्रद्धेचें फळ

सौ. शालिनीबाई चिंतामण ढापरे सेक्रेटरी महिला मंडळ, फणसा-कलगांव ( तालुका उंबरगांव स्टेशन भिवाड जि. सुरत. ) या लिहितात कीं,

बाबा वदति कथा श्रवण । करा मनन आणि निदिध्यासन ।
होईल स्मरण आणि ध्यान । आनंदघन प्रगटेल ॥

श्रीसाईबाबांचें निजधामास आज सुमारें ४५ वर्षे होत आलीं. आमचें माहितींत मात्र ९-१० वर्षे होत आलीं. सर्व धर्म समानत्व अशा संत पुरुषाची थोरवी समजल्यावर आम्ही सर्व कुटुंब साईभक्त बनलो. शिर्डीस जाणेंचा योग मात्र अद्याप लाभला नाहीं. मनानें मात्र शिर्डीचें ध्यान दररोज होतें. प्रार्थना हेंच एकमेव साधन होय. संसारांत ऐहिक सुखोपभोगांत गुरफटलेलें राहून संकट समयीं मात्र देव-धर्म आठवितो, संसारांतील नाना प्रकारांच्या दुर्गुणांनीं व्यापलेले आपलें जीवनक्रम प्राप्त होणेंस श्रीसाईबाबांसारख्या संत पुरुषांनीं दाखवून दिलेली गुरुकिल्लीची आपण अवहेलना करितों मग शांति कशी लाभणार ? संसार सोडून या असें कधींहि संत पुरुषांनीं सांगितलेलें नाहीं. उलट संसारात राहून साधना प्राप्त करावयाची असते. खरोखर स्वामी रामकृष्ण परमहंस, विवेकानंद, ज्ञानदेव, तुकाराम, रामदास, श्री साईबाबा, म. गांधीजी, संत विनोबाजी वगैरे सारख्या संत-थोर पुरुषांनीं दाखवुन दिलेला साधा-सरळ बिन खर्चाचा मार्ग म्हणजे ईश्वर ' प्रार्थना '. मग आपले दैनंदिनांत ह्याचा अंगिकार करावयास नको कां ? अंतःकरणपूर्वक व निस्सीम श्रद्धा

ठेवून श्रीसाईबाबांसारख्या ईश्वरी अवतारांची मनोभावें प्रार्थना केल्यास आपले जीवनांस निश्चित शांति मिळते व मोठमोठी वाटणारी संकटें क्षणभंगूर होतात. ह्या बाबतींत मजला अनेक अनुभव आलेले आहेत त्यापैकीं अगदीं अलिकडचे दोन अनुभव खालीं देत आहे :—

( १ ) माझे यजमान श्री. चिंतामणी हरिभाऊ ढापरे यांची ग्रामपंचायतीचे नूतन कायद्यानुसार तलाटी कम्‌मंत्री कॉमनकेडर म्हणून फणसा येथून धरमपूर ( जि. सूरत ) तालुक्यांतील ' आंवाजंगल ' सजाचे जंगलांत दूरवर माहे डिसेंबर १९६२ मध्यें एकाएकी ध्यानीं–मनी नसतांना बदली झाली. आमचे जीवन नोकरी–पगारावर कुटुंबांत लहान–मोठीं मिळून ७–८ इसम मग पैसा काय शिल्लक असणार ! बदलीमुळें उधारी व्यवहार बंद. आम्ही सरकारी नोकरींत आहों म्हणजे बदलीचे ठिकाणीं जाणेस ॲडव्हॅन्स रक्कम मिळेलच ही कल्पना ! परंतु तांत्रीक अडचणीमुळें रक्कम मिळण्याची शक्यता नाहीं असें समजलें. त्यायोगें आपणावर मोठे संकट आलेले आहे ह्या विचारांत १।२ दिवस पसार झाले. निष्ठा व श्रद्धा ठेवून नित्यनियमानुसार सायंकाळीं प्रार्थना आटपून आपली काळजी श्रीसाईबाबांस आहे ह्या भरंवशावर राहिलों. आश्चर्य काय सांगावें ? दुसरा दिवस उजाडला आणि टपालांत त्यांच्या स्नेहाचें पत्र कीं, आपणांस बदलीप्रवासासाठीं ॲडव्हान्स रकम मिळणार आहे असें साहेबांनीं सांगितलें आहे व त्यासाठीं अर्ज पाठवावा. त्याप्रमाणें योग्य ती तजवीज केल्यावर ॲडव्हन्स रक्कम मिळाली. खरोखर ईश्वर भक्तासाठीं कोणांस कशी प्रेरणा देवून संकट निवारण करितात ही सारी लीलाच नव्हे कां ?

( २ ) मी आपल्या वाढत्या संसारास मदत व्हावी, मजला ह्यांचे नोकरीचे वेळेपासून पोस्टाचे कामाचा अनुभव झाल्यानें संसार सांभाळून आमचे जवळील कलगांव खेडे गांवातील ब्रँच पोस्ट ऑफिसचें काम गेलीं ३।४ वर्षे करीत आहे. हें पोस्ट ऑफिस सुरूं करणेंस आमचीच खटपट होय. हें पोस्ट ऑफिस केवळ हरिजन गरिब लोकांचे सोईसाठीं असल्याचें मानलें जातें व अनायसा ह्या अस्पृश्य समजण्यांत येणाऱ्या लोकांची सेवा आपणांस करणेंस संधी मिळत आहे म्हणजे स्वार्थ–परमार्थ ह्या दुहेरी हेतूनें हें अल्प वेळेचे काम पत्करलें, परंतु कांहीं सत्ताधार–श्रीमंत लोकांना हें पसंत वाटेना. म्हणून आपल्या सत्तेच्या हुद्याच्या जागेवरील जोरावर माझे विरुद्ध वरिष्ठांकडे तक्रारी अर्ज करण्यांत आले. त्या कारणानें मला नोकरीवरून कमी करणेंत येणेंची दाट वदता गांवांत पसरली. मी मात्र हें समजल्यापासून, माझ्या नोकरी कामांत कसूर नाहीं, मी कोणाचेंहि नुकसान केलेलें नाहीं व करण्याची इच्छाही ठेविली नाहीं मग हें कां बरें असें व्हावें ह्या विचारांत मग्न असें. उलट माझे स्वखर्चानें पत्र

लेखन साधनाची सोय करून जेवढी आपणांस शक्य होईल तेवढी जन सेवा करणेंस तजबीज ठेवी. माझा नोकरीचा आधार जाणार, संसारांतील मदत बंद होणार, एक तर माझे यजमानांची बदली दूरवर जंगलांत झालेली, माझे ५ मुलां-बाळांची जबाबदारी, माझे शिक्षण फारसें झालेले नाहीं, नातेवाईक मंडळी दूरवर महाराष्ट्रांत वगैरे विचाराचें चिंतेत दिवस घालवित असें. अशा परिस्थितींत नित्याप्रमाणें प्रार्थना करीत राहिलें व ईश्वराचा धावाहि करीत असें. कांहीं दिवसानंतर खात्याचे वरिष्ठ अधिकारी अचानकपणें गांवीं येऊन तक्रारी अर्जाबाबद तपासणी करून गेले. परंतु माझे बाबतींत तसें कांहींच दिसून न आल्यानें माझें संकट टळलें. खरोखर ही साईलीला नव्हे काय?

सरतेशेवटीं माझी सर्वत्रास नम्र विनंती कीं, ईश्वर–रहिम सर्व एकच आहे. सर्वत्रांनीं एकोप्यानें राहावें, भारताचे विकासास सर्वत्रांनीं हातभार लावावा व आप-आपल्या परिवारांसह दररोज ईश्वरावर पूर्णश्रद्धा ठेवून, जात–धर्म वगैरे कांहीं एक न मानतां अंतःकरणपूर्वक प्रार्थना करीत जावी व शेवटीं खालील प्रार्थना करावी.

सर्वत्रा सौ सुखी भाओ । समता सौ समाचरो ॥
सर्वत्र दिव्यता व्यापो । सर्वत्र शांति विस्तरो ॥

× × × ×

## लक्ष लावी जो मजकडे

श्री. कामत ( साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, फ्लॅट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४ ) हे लिहितात कीं,

श्रीसाईबाबा म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वरच आहेत, याचा अनुभव ते आमच्यांत वावरत होते त्यावेळीं येत होता व आतांही त्यांच्या मागें त्यांच्या भक्तांना येत आहे. पूर्वी मी त्यांचा भक्त नव्हतों. तरीही त्यांच्यांतील देवत्वाचा अनुभव मला आला.

शिरडी संस्थानची कचेरी पूर्वी कोटांत ईस्ट अँड वेस्ट इमारतींत होती. पूर्वी साईलीला त्रैमासिक होतें. त्यावेळीं अंकांचा बोजा पोष्टांत वाहून नेण्यासाठीं मी जवळ-पास असलो तर मला बोलावीत असत. त्यावेळीं अंकांच्या कव्हरवर असलेला साई-बाबांचा फोटो माझ्या पहाण्यांत आला. त्यावेळीं माझ्या मनांत सहज विचार येऊन गेला कीं, या कचेरींत मला नोकरी मिळाली तर किती चांगलें होईल! माझें शिक्षण मॅट्रीकपर्यंत झालेलें व मी कसें बसें आयुष्य कंठीत होतों. इतक्यांत थोड्याच दिवसानीं अंक पोष्टांत टाकण्याच्या कामगिरीवर असलेले कारकून मी ७८ दिवस उपवासांत दिवस कंठीत असलेल्या जागीं आले व त्यांच्या बोलावण्यावरून त्या कचेरींत मी

शिपाई या नात्यानें राहिलों. ता. २० मार्च १९५८ रोजीं मी नोकरीवर रुजू झालों तो आजपावेतों त्या नोकरीवर सुखासमाधानानें आहे. त्यापूर्वी मी नोकरीसाठीं वणवण फिरत होतों. माझ्या आई–वडिलानीं मला देतां येण्यासारखें होतें तेवढें शिक्षणही दिलें; परंतु दुर्दैवानें मला नोकरी कांहीं केल्या मिळत नव्हती. बाबांच्या कृपेनें ती मिळाली असें मी समजतों. त्यांच्याच कृपेनें मी सुखासमाधानांत, व आहे त्यांत समाधान मानून जगांत वावरत आहे. मला महागाईसह सध्यां पगारही १७६ रु. मिळत आहे.

सध्यांच्या काळांत एखादी लहानसहान नोकरी मिळविणें किती जड झालें आहे हें का सांगितलें पाहिजे? एका जागेसाठीं हजारों अर्ज येतात! कोणाची निवड करावयाची? सध्या वशिलेबाजी, पैसेखाऊपणा, काळाबाजार, फसवेगिरी यांना सर्वत्र ऊत आलेला आहे. अशा परिस्थितींत साईबाबानीं माझी अडचण ओळखली व माझ्यावर आपल्या कृपेचा वर्षाव केला. मला अर्ज करावा न लागतां नोकरीसाठीं बोलावणें आलें हें मी माझें खरोखर भाग्य समजतों. बाबानी सांगितलें आहे कीं, 'लक्ष लावी जो मजकडे। नाहीं तयासी कैचेंहि सांकडे।' तें त्रिवार सत्य आहे, ही गोष्ट माझ्या मनाला पटलेली आहे.

× × × ×

## पत्नीची फोटोची इच्छा पूर्ण झाली

श्री. केशव महादेव पेडणेकर, गव्हर्नमेंट हाऊसिंग कॉलनी खेरनगर, पूर्व बांद्रा हे लिहितात कीं,

वंदन साईबाबा दयाळा ॥
पूजितो–भावें–तवपद कमला ॥ वंदन साई. ॥
दीन अज्ञ आम्ही–बालकें ॥
सुज्ञ करि बा–कृपा प्रसादें ॥
देई–सुख शांती -सकलां ॥ वंदन साई. ॥ १ ॥

श्री साईबाबा ही महान विभूती होऊन गेल्याचें मी ठिकठिकाणीं वाचलें व ऐकलेंही! आज भारतात व इतरत्र साईबाबांचे अनेक भक्त आहेत. कोणी म्हणतात ते साधु होते, कोणी म्हणतात ते श्री गुरुदेव दत्ताचे अवतार होते. शहरोशहरीं व खेडोपाडीं अनेक घरांत साईबाबांचे फोटो पूजिलेलें दृष्टिस पडतात. संध्याकाळची त्यांची आरती करण्याची प्रथा आहे. अडचणीच्या वेळीं, संकटकाळीं व अपरिहार्य अवस्थेंत त्यांचे स्मरण केल्यास ते भक्ताला हात देतात व वांचवितात आणि सुखी जीवनाचा लाभ करून देतात अशा आख्यायिका फार आहेत. अजूनही शिर्डी संस्थानमध्यें

त्यांच्या वास्तव्याची दरम्यानचीं जुनीं माणसें त्यावेळीं अनेक चमत्कार घडल्याची ग्वाही देतात. अनेक पुस्तकांतून तसे उल्लेखही सांपडतात.

"शिर्डीचे साईमहाराज" हें पुस्तक वाचीत असतानांच, एका सद्गृहस्थानें थोडंसं विपरीत बोलून माझ्या मेंदूला एक जबरदस्त झटका दिला. तो साईबाबाविषयीं अनादरयुक्त बोलूं लागला. त्याचं म्हणणं असं, "हे जर साधु होते तर जसे संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम. संत रामदास वगैरे जे महान् साधुसंत होऊन गेले आणि त्यांनीं बहुजन समाजासाठीं मागें ज्ञानेश्वरी, गाथा श्लोक ठेवून संसारी लोकांना कल्याणाचा मार्ग दाखवून ज्ञान मिळवून दिलें, तसें, यांनीं कांहीं एखादा ग्रंथ लिहिलेला नाहीं. त्यांच्या-वर ज्यांनीं ज्यांनीं पुस्तकें लिहिलीं; तीं काय त्यांच्या साधुत्वाची पूर्णपणें साक्ष देऊं शकत नाहींत !"

त्यावर मी म्हणालों, "अहो ग्रंथ लिहिल्यावरच जर खरा साधु होऊं शकेल तर आत्ताचे सारे ग्रंथकार साधु म्हणूनच ओळखावे लागतील; पण माझ्या मतें ग्रंथांत लिहिलेल्या पुष्कळ गोष्टीपेक्षां कृतींत उतरलेल्या अनेक गोष्टी साधुत्वाची साक्ष देण्यास खचित समर्थ ठरतील"! एखाद्या संत महात्म्याला शोभून दिसण्यासारखीच रहाणी व वागणूक श्रीसाईबाबा यांची होती. यापेक्षां मी कांहीं अधिकार वाणीनें अधिक बोलूं शकत नाहीं." असं मी म्हणतांच, "जाऊं द्या हो" या जगांत कोणीच साधु-संतांची कृपा मिळवून आपलं ध्येय गांठू शकत नाहीं. मनुष्याला जें कांहीं मिळवावयाचें आहे तें त्यानें आपल्या मगदुरावर मिळविलें पाहिजे व तो तें मिळवूं शकतो." हे त्याचे विचार ऐकून त्याच्याशीं वादविवाद करून कांहींच निष्पन्न होणार नाहीं, असं वाटून, मी त्या विषयाला कलाटणी देऊन त्यांचं तोंड बंद केलं.

पण वाचकांना माहित आहे कीं ज्या ज्यावेळीं आपल्या भारत भूमीवर साधु-संतांचं आणि महंतांचें लोक कल्याणासाठीं अविरत कार्य चालू असे, त्या त्यावेळीं त्यांच्या कारकिर्दीत विरोधक, व स्वतःची महती व बडेजाव थोर असल्याचें भासविणारे लोक होऊन गेले. तसेच आजही कांहीं महाभाग या जगांत वावरत आहेतच ! तेव्हां सत्य असत्याची पारख नसलेल्या या लोकांशीं निरर्थक वाद घालण्यांत काय हांशिल?

आतां मला जो प्रत्यक्षानुभव आला तो मी वाचकांसाठीं पुढें देत आहे. कोण्याहि देवतेचं, साधुसंताचं अगर महंताचं महात्म्य पटल्याशिवाय त्याचं भजन, पूजन व मनन करून अवडंबर माजविणं माझ्या मनाला पटत नाहीं. पण साई-बाबांच्या बाबतींत सांगावयाचें म्हणजे, माझा अनुभव वेगळाच आहे, आणि म्हणूनच मी त्यांचें स्मरण व मनन करित असतों. माझ्या सौभाग्यवतीची तर लहानपणा-पासूनच साईबाबावर पूर्ण श्रद्धा ! आमची मुलें दररोज उदबत्ती निरंजन पेटवून प्रार्थना व आरती करतात. फक्त गुरुवारी पुष्पहार व प्रसादयुक्त प्रार्थना व आरती

होतें. ज्या फोटोसमोर हा कार्यक्रम नित्य होतो, तो फोटो आमच्या घरांत कसा आला? यासंबंधीं सविस्तर माहिती मी जशी घडली तशीच पुढें देत आहे—

मी बेकारावस्थेंत असतांना नोकरीच्या निमित्तानें सकाळींच घराबाहेर पडलों होतों. इकडे तिकडे वणवण फिरून दमल्यावर मुंबईतील एका बगिच्यांत विसावा घेत पडलों होतों. पैशाच्या अभावीं तहानभूक शमविण्यासाठीं कोणत्याही हॉटेलमध्यें जाणं अशक्यच होतं! भूक नाहीं पण तहान भागविणारं साधन जवळच दिसल्यावर त्या नळाचं पाणी आकंठ पिऊन तृषा भागविली व थोडा ताजातवाना होतांच पुढच्या मार्गा आक्रमूं लागलों. घरीं जाऊन झोपेंत व आळसांत वेळ घालविण्यापेक्षां कुठेतरी जाऊन धडपडणं अधिक श्रेयस्कर वाटून वाट चालू लागलों. रस्त्यांत एका स्नेह्याची गांठ पडल्यावर त्यानें स्वतः होऊन चहा पाजला. पुढें जातांच त्याचा एक स्नेही भेटला व आम्ही गप्पा मारित तिथे चालत असतानांच रस्त्यांत आमच्यासमोर पडलेल्या एका कागदाच्या सुरळीवर माझी नजर गेली. ती मी पटकन उचलली. तें एक चित्र असल्याचं लक्षांत आलं. मला लहानपणापासूनच चित्रांचा इव्यास! आणि म्हणूनच मी चित्रें संग्रहित करित असें. ती सुरळी पूर्ण उघडतांच, तो श्री साईबाबांचा रंगीत फोटो असल्याचं समजलं. चित्र तर आकर्षक होतंच; पण त्यावर लिहिलेलं अधिक महत्वाचं होतं!

"Why should any fear when I am here?"

"Cast all your burdens on me and I will bear them."

—Shri Saibaba

तं वाचल्यावर मला आश्चर्य वाटलं व तें माझ्या स्नेह्याला दाखवून मी हंसलों. त्यांच्या तें तत्काळ लक्षांत आलं. कारण मला तो चांगल्याप्रकारें जाणत होता. त्याचे स्नेही म्हणाले, "फारच छान चित्र आहे. तुम्हाला तें मिळालं म्हणजे तुम्ही भाग्यवान आहांत बुवा!" मी मनांत म्हणालों कसलं भाग्य आणि कसलं काय? काम नाहीं. सबंध दिवस बाहेर उपाशीं भटकतों व घरींसुद्धां खावयास कांहीं नाहीं. इतक्यांत ते गृहस्थ उचारले, "अहो आम्ही साईबाबांची भक्ति करतो पण आम्हाला कांहीं असा एखादा फोटो अद्याप मिळालेला नाहीं; तुम्ही तो फ्रेम करून घ्या!" माझ्या मनांत विचार घोळत होते; खिशांत नाहीं एक आणा चणेकुरमुरे खायला मग फोटोफ्रेम कसा करावयाचा? त्यांना संत्रेमोसंबी खरेदी करावयाची होती म्हणून आम्हीं फ्रूटमार्केटमध्यें गेलों व बाहेर पडतांना मार्केटच्या दरवाजांत आल्यावर लक्षांत आलं कीं काखेंतली ती सुरळी कुठें तरी पडली. पण त्याच वेळीं मागून कुणीतरी हांक मारून सांगितलें, "अहो हें पहा तुमचें कांहीतरी पडलें आहे!" तिथें जाऊन ती सुरळी मी पुन्हां उचलली. ती पुन्हां

सांपडल्यावर मात्र माझ्या डोक्यांत एक कल्पना आली. सौ.ना प्रिय देव तिला देऊन खूष करण्याची सुवर्णसंधी मला लाभली होती. माझ्या स्नेह्यांनें त्या दिवशीं आपल्या-बरोबर त्याच्या खाणावळींत मला जेवण दिलं. त्यानंतर मी घराची वाट सुधारली !

सौ.ला फोटो दाखवितांच ती खूष झालीच ! आणि तिला तितकंच नवलहीं वाटलं. कारण त्याच दिवशीं सकाळीं ती एका साईभक्त नातेवाईकांकडे जाऊन म्हणाली "मी इतकें दिवस बाबांची भक्ति करतें, पण मला एखादा फोटो मात्र खोलींत, आणा-यला मिळत नाहीं." ते म्हणाले "येईल आज ना उद्यां फोटो घरांत ! चिंता कशाला करतेस ?" आणि बोला फुलाला गांठ पडते म्हणतात ना ! तसाच प्रकार घडला होता त्या दिवशीं ! सौ. लासुद्धां फोटो फ्रेम करून घेण्याची ईच्छा तात्काळ झाली व तिनें ती प्रकट केली. मी सांगितलं. "हें पहा सध्यां खाण्यापिण्याची मुष्किल आहे तेव्हां फ्रेम करण्याची मनिषा अनाठायींच नाहीं कां ?" आतां मी असं करणार; हें चित्र मी माझ्या बॅगेंत ठेवणार ! जोपर्यंत मला नोकरी नाहीं तोंपर्यंत या चित्राला हीच जागा योग्य आहे. ज्यावेळीं नोकरी मिळून पहिला पगार हातीं येईल त्यावेळीं फोटो फ्रेम करून मिळेल, नाहींतर नांवच काढू नकोस फ्रेम करण्याचं !"

त्यानंतर चार सहा दिवसांनीं मला नोकरीचा कॉल आला. प्रथम टेंपररी नोकरी करतां करतां थोड्याच अवकाशानंतर कायम नोकरी मिळाली. मी वर सांगितल्याप्रमाणें पहिल्या पगाराच्या पैशांतूनच फोटो फ्रेम करून आणला व शुभमुहूर्तावर खोलींत लावला त्यावेळेपासून दररोज संध्याकाळीं दिवाबत्ती, प्रार्थना व आरती आमचेकडे चालू आहे. आणि त्यामुळेंच सुरवातीसच दिलेले वंदनगीत तयार करण्याची मला स्फूर्ति आली. ज्यानीं ज्यानीं तें ऐकलं आहे त्यांना ते आवडल्याचं त्यानी स्पष्ट केलं आहे.

महत्त्वपूर्ण अशी आणखी एक गोष्ट—दरवर्षी शिर्डीची वारी करणारे श्री साईबाबांचे एक परम भक्त एकदां मला म्हणाले कीं, "मी ज्यावेळीं शिर्डीला जाईन त्यावेळीं तुम्हीं माझ्याबरोबर याल का? त्यावर थोडासा विचार करून ( त्यावेळीं मी बेकार असल्यामुळें ) सांगितलें "अवश्य येईन." जरूरीपुरतें पैसे मिळवून मी जाण्याची शक्यता होती; पण हे महाशय मला न कळवतांच शिर्डीला जाऊनहि आले. त्यांना तर केव्हांहि जाणंयेणं सोपं होतं. कारण ते आहेत रेल्वे सर्व्हंट ! लिहिला पास कीं चालले. मी बरोबर असल्यास तिकिटांचा व इतर खर्च अंगावर पडून भुर्दंड पडेल या भितीनेंच त्यानी कळविण्याचं टाळलं होतं. पण मी विचारतांच "मी घाईतच गेलों हो" असं त्यानीं सांगितलं. मी मनांतल्या मनांत थोडासा हळहळलों !

त्या दिवशीं रात्रीं मध्यान्हानंतर दाट झाडी असलेल्या एका रानांत हिंडवीत मला श्री. साईबाबा सर्व प्रकारची माहिती देत असल्याचा स्वप्नांत दृष्टांत झाला. जवळच

एक पर्णकुटी दिसत होती. पालापाचोळ्याच्या भिंती व छप्परही त्याच प्रकारचें! फक्त देवादिकांचें फोटो मात्र भिंतीवर लटकाविलेले होते. पर्णकुटीजवळ येतांच बाबांनीं दिरच्या पानांच्या पुड्यांत बांधलेली पिकलेली काळी करवंदें आपल्या झोळींतून काढून पुडी फोडली व त्यांतली अर्धी मला दिली व अर्धी आपण घेतली. माझ्या वाट्यातील थोडीशी मी सौ. साठीं ठेवीत असल्याचं पाहून तीं सर्वच खाऊन टाकण्याची मला बाबांनीं आज्ञा केली. मी आज्ञा पालन केली. पण पर्णकुटींत वाट पहात असलेल्या सौ.ला द्यावयास माझ्या हातांत कांहींच शिल्लक नव्हतं. ती उपाशीच होती. तिला खावयास काय द्यायचं? हा विचार मनांत येतांच मी बाबांकडे दृष्टी वळविली. तोंच त्यांनीं पूर्वीप्रमाणेंच आपल्या झोळींत हात घालून दुसरी एक पुडी काढून सौ.च्या हातांत देतांच माझ्या तोंडाला पुन्हां पाणी सुटलें.

पण त्या ठसठसीत करवंदांचा लाभ मला मात्र झाला नाहीं. कारण साईबाबांच्या समोर मागतां येत नव्हतं! "माझ्या पर्णकुटींत यापेक्षां निराळी मेजवानी कांहीं मिळूं शकणार नाहीं" असं बाबांनी सांगितलं. आणि तो प्रसाद भक्षून आम्ही त्यावरच राहिलों.

सकाळीं उठतांच हें अकल्पित स्वप्न मी सौ. ला सांगितलं. ओघाओघानें तिनें तें वर उल्लेखिलेल्या साई भक्तास सांगतांच त्यांची मत्सरबुद्धी जागृत झाली व तो म्हणाला "मीं इतकी वर्षं शिर्डीला जातों तरी मला अजून कधीं साईबाबा स्वप्नांत दिसले नाहींत; मग यांना कसा काय दृष्टांत दिला बुवा? निव्वळ थापा मारित असतील झालं"! यावर माझी सौ. तरी काय उत्तर देणार?

अजूनही मला शिर्डीला जाण्याचा योग येत नाहीं. पण कुणीही शिर्डीला जाऊन आल्यास उदी व प्रसाद मात्र मला आपोआपच मिळतो. हीच श्री साईबाबांची कृपा असं आम्हीं समजतों.

---

त्याग —

त्याग अगदीं मुळावर घाव घालणारा आहे, दान वरून वरून पालवी खुडण्यापैकीं आहे. त्याग पोटांत घेण्याची दवा आहे, दान कपाळावर फांसण्याची सुंठ आहे. त्यागांत अन्यायाची चीड आहे, दानांत लौकिकाची भीड आहे. त्यागानें पापाचें मुद्दल फिटतें, दानानें पापाचें व्याज चुकतें. त्यागाचा स्वभाव दयाळु आहे. दानाचा स्वभाव मायाळु आहे. दोन्ही धर्मच आहेत. त्यागाची वस्ती धर्माच्या माथ्यावर आहे, दानाची वस्ती धर्माच्या पायथ्याशीं आहे.

— संत विनोबा

# स्वामी शिवानंद यांचा विशेष परिचय

—पु. वा. कुळकर्णी

गेल्या जुलै महिन्यांत वयाच्या ७६ व्या वर्षी समाधिस्थ झालेले भारतीयच नव्हे तर जागतिक कीर्तीचे थोर संत स्वामी शिवानंद यांचा अल्प परिचय यापूर्वीच त्यांच्या निधनाची नोंद घेत असतां आमच्या वाचकांस करून देण्यांत आला असला तरी त्या सत्पुरुषाची जितकी अधिकाधिक माहिती करून घ्यावी तेवढी थोडीच होईल. संत चरित्रांचें गायन पुन्हां पुन्हां व परोपरीनें केलें जावें कारण तें कल्याणप्रद असतें.

स्वामी शिवानंद हे जागतिक कीर्तीचें संत होऊन गेले असें वर म्हटलें तें खरेंच आहे. त्यांचा चहाता व शिष्यवर्ग जगभर पसरलेला आहे. युरोपांत, अमेरिकेत व इतर देशांतही आहे. त्यांनीं आधुनिक काळांतील प्रचारतंत्रांचा फायदा शक्य त्या प्रमाणांत करून घेतला. लोककल्याणकारी असा आपला जीवन संदेश जगाच्या कोनाकोपऱ्यांतून पसरावा व जास्तींत जास्त लोकांनीं त्याचा फायदा घेऊन आपलें जीवन सुखी व समृद्ध करावें असें त्यांना वाटत असे. त्यांनीं इंग्रजींत लिहिलेलें अध्यात्म विषयांवरील ग्रंथभांडार विपूल आहे. मुद्रण कलेचा त्यांनीं जास्तींत जास्त सदुपयोग करून घेतला. तिला आपली आटोक्यातील दासी बनवून तिचा ज्ञान प्रसारार्थ त्यांनीं फार चांगला जास्त उपयोग करून घेतला असें म्हणणें वस्तुस्थितीस सोडून होणार नाहीं.

## शिक्षण व व्यवसाय

स्वामी शिवानंद यांचा जन्म तिरुनेलवेली जिल्ह्यांतील पट्टमदाई नामक एका खेड्यांत झाला. त्यांच्या वडिलांचें नांव होतें वेंगु आय्यर व मातोश्रीचें नांव होतें पार्वती अम्मल. त्यांचा जन्म झाला तो भरणी नक्षत्रावर. आणि त्या नक्षत्रावर जन्मलेली माणसें साऱ्या जगावर अधिकार चालविणारी होतात, असें सांगतात. इतर बाबतींत कोणताहि अनुभव असो, परंतु स्वामी शिवानंद यांच्या बाबतींत मात्र तो अनुभव खरा ठरलेला आहे.

श्रीशंकराचार्य व आधुनिक काळांतील थोर सत्पुरुष स्वामी विवेकानंद यांच्या पावलांवर पाऊल टेऊन त्यांनीं हिंदु धर्माची पताका सर्वत्र प्रभावीपणें फडकाविली.

अध्यात्माकडे वळण्यापूर्वी त्यांचें जीवन कोणत्या प्रकारचें होतें तें जरा पाहूं या. त्यांनींच एके ठिकाणीं लिहिलें आहे कीं, बालपणीं मी फार द्वाड मुलगा होतों. दंगामस्ती करायला फार आवडायची! उच्च शिक्षण झालें त्रिचनापल्लीच्या महाविद्यालयांत. त्यांनीं व्यवसाय या नात्यानें डॉक्टरी पेशा पत्करला. मलायांत सुमारें दहा वर्षे तो व्यवसाय त्यांनीं लोकसेवेच्या दृष्टीनें केला.

## संन्यासग्रहण व भ्रमंती

आणि नंतर उपरति होऊन १९२४ सालीं त्यांनीं संन्यास घेतला. हृषिकेश मध्यें संन्यास घेतला तरी तपस्या करायची होती. ध्यान धारणा व तपस्या यांत त्यांनीं यानंतरची सुमारें पंधरा वर्षे घालविलीं. त्यानंतर दहा वर्षे देशभर व परदेशांतही अध्यात्मावर प्रवचनें देत सुमारें दहा वर्षे ते फिरत होते व लोक स्थितीचें अवलोकन करीत होते.

१९३६ मध्यें त्यांनीं जगांत अध्यात्मज्ञानाचा प्रसार करण्याच्या हेतूनें 'डिव्हाईन लाईफ सोसायटी' या नावाची संस्था स्थापन करून ती अखेरपर्यंत वाढत्या यशानें चालविली.

परिव्राजक या नात्यानें भ्रमंतीच्या काळांत त्यांनीं सर्व प्रकारच्या हालअपेष्टा भोगल्या. अन्नाशिवाय कित्येक दिवस त्यांनीं काढले आहेत, त्याचप्रमाणें अंगावर वस्त्र प्रावर्ण नसल्यामुळें थंडीत कुडकुडण्याचा अनुभव भरपूर प्रमाणांत घेतला आहे. 'चणे खावे लोखंडाचे, तेव्हां ब्रह्मपदीं नाचें' हें चालावयाचेंच. केवळ पाण्याबरोबर सुका भाकरीचा तुकडा खाऊन रहाण्याचा अनुभव त्यांनीं दिवसांचे दिवस घेतला आहे!

## लेखन व प्रचार कार्य

मद्रास येथून 'माय मॅगाझीन' या नावाचें एक लोकप्रिय इंग्रजी मासीक प्रसिद्ध होत असतें. त्या मासिकांत अध्यात्मावर आरंभ काळांत ते नियमीतपणीं लिहीत असत. अत्यंत सोप्या व हृदयस्पर्शी भाषेंत आपले विचार मांडण्यांत त्यांचा पूर्वीपासून हातखंडा आहे. त्यांच्या तत्त्वांचा प्रसार सुरू झाला तसतसा देशभर त्यांचा चहाता वर्ग वाढूं लागला. त्यांचे लहानमोठे ग्रंथही बाहेर पडूं लागले. त्यांच्या सभोंवार मार्गदर्शनासाठीं शिष्यगण जमा होऊं लागला. आणि मग हृषिकेश येथें आश्रम स्थापन करण्याची व पुढें त्याचा विस्तार करण्याची जरूरी त्यांना भासूं लागली.

स्वामी शिवानंद यांच्या कार्याला उत्तरोत्तर यश येत गेलें, याचें कारण काय? तेच एके ठिकाणीं काय म्हणतात पहाः— सतत काम करीत रहाणें मला मनापासून

आवडतें. आळसांत एकही क्षण मी बसून रहाणार नाहीं. हातीं घेतलेलें काम अर्धवट मी कधींही सोडून देणार नाहीं. तें पूर्ण होईल तेव्हांच त्याची सुटका. एरवीं नाहीं ! मला काम पूर्ण करण्याची सतत घाई लागून राहिलेली असते. कारण दुसरी कामें वाट पहात असतात. आपल्याकडून कांहीं ना कांहीं सेवा घडावी यासाठीं माझी सतत धडपड चाललेली असते. सेवाभाव माझ्या मनांत सतत वावरत असतो व त्याच्या लाटांवर लाटा अंतःकरणांत उसळत असतात. त्या मला जरासुद्धां स्वस्थ बसूं देत नाहींत. सेवा हाच माझा आनंद व तोच माझा मोक्ष असें मी समजतों. सेवाभावानें मला आज उच्च पातळीवर आणून सोडलें आहे व त्याच भावनेनें माझें पावित्र्य वाढविलें आहे.

स्वामी शिवानंद यांची आध्यात्मिकदृष्ट्या पातळी उत्तरोत्तर वाढत गेली व त्या वाढीचा उपयोग त्यांनीं जनकल्याणासाठीं भरपूर प्रमाणांत केला. आपल्यापाशीं जें जें कांहीं आहे तें त्यांनीं सारें जगापुढें खुलें केले. जें आहे ते सर्वांचें व सर्वांसाठीं मी सर्वांचा व सर्वांसाठीं आहे ही त्यांची भावना अखेरपर्यंत होती.

## प्रगतीचें कारण

अध्यात्मिक क्षेत्रांत त्यांची एवढी प्रगती झाली याचें कारण म्हणजे त्यांनींच सांगितल्याप्रमाणें प्राणायाम व आसनें करण्यावर त्यांची फार भिस्त होती. तीं वेळच्या-वेळीं करावयाचीं. त्यामुळें त्यांना उत्साह व काम करण्यासाठीं भरपूर हुरूप येत असे. ते म्हणतात, त्यामुळें मी नेहमी उत्साहांत व आनंदांत असे. चिरतारुण्य अंगांत मुसमुसत असे. सतत कामांत गुंतून राहिल्यामुळें मनांत दुसरें कोणतेही विचार येण्यास वाव नसे. सेवेंत दंग राहिल्यानें मनाला सात्वीक समाधान मिळत असे. ध्यानांत कांहीं काळ घालविल्यानें संपूर्ण शांतीचा लाभ होत असे. नामसंकीर्तन मला अत्यंत पोषक ठरलें.

'अहं ब्रह्मास्मि. शिवोहं. सोहं, सच्चिदानंद स्वरूपोहम्' हे त्यांचे नित्याचे पठण मंत्र होते. त्या मंत्रांत ते तल्लीन झालेले असत.

'चिदानंदाचें गाणें' हें त्यांचें आवडतें गीत होतें.

शिवाय त्यांचें नेहमींचें संकीर्तन होतें–'हरे राम हरे राम, राम राम हरे हरे। हरे कृष्ण हरे कृष्ण । कृष्ण कृष्ण हरे हरे ॥''

त्यांचा आहार साधा असे. आहारांत दूध व फळें यांना विशेष महत्त्व असे. एकादशीला ते उपोषण करीत. त्या दिवशीं पाण्याचा थेंबही ते घेत नसत.

## आरोग्य संपादन

नियमीतपणा, नेमस्तपणा व निश्चितपणा या तीन गोष्टी आरोग्याच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाच्या आहेत. स्वामीजींच्या दैनंदिन जीवनांत या तिन्ही गोष्टींना भारी महत्व असे. विद्यार्थी दशेपासून त्यांना व्यायामाची संवय जडलेली होती. ती कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत शेवटपर्यंत कायम होती.

गंगामाता व उत्तुंग हिमालय या दोन्हींचें त्यांना भारी आकर्षण होतें. गंगा ही माझी माता व हिमालय हा माझा पिता असें ते म्हणत असत व तसाच त्यांना बहुमान देत असत.

त्यांचे अध्यात्मिक सोबती कोण होते माहीत आहे? १ गीता, २ उपनिषदें, ३ भागवत, ४ योगवाशिष्ट, ५ अवधूत गीता व ६ विवेकचूडामणी हे पांच ग्रंथ ते नेहमीं जवळ बाळगीत असत व मधून मधून त्यांची पारायणें करीत असत.


असे होते स्वामी शिवानंद !

---


### जनतेचे आरोग्य म्हणजेच राष्ट्राचे सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान बनविण्यासाठीं बलवान बनाः**—यासाठीं लागणारी हरेक तऱ्हेची उपकरणें म्हणजे डंबेल्स्, लेझीम, मुगदुल, यासारखा सर्वश्रेष्ठ व उत्तम तऱ्हेचा माल बनविण्यांत येतो.

आम्ही कांदिवली टिचर्स ट्रेनिंग इन्स्टिटयूट, डि. स्कूल बोर्ड, जिल्हा परिषद, नगरपालिका, ग्रामपंचायती, व्यायामशाळा, विकास केंद्रें, याना माल पुरवितो. अधिक माहिती आणि कॅटलॉगसाठीं लिहाः...



**लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल वर्क्स,** ८५ बापू खोटे स्ट्रीट, जांभळी मोहोला, मुंबई ३

# धम्मं सरणं गच्छामि

***************************

बौद्धधर्म हा शांतिमय नैतिक आत्मविकासाचा धर्म आहे. ह्या धर्माचे दोन पंथ आहेत. एक हीनयान आणि दुसरा महायान. शिवाय लहानसहान आणखीहि सुमारें अठरा पंथ आहेत. ह्या पंथोपपंथांमध्यें एकोपा नव्हता. इ. स. ६२९ ते ६४५ ह्या दरम्यान भारतांत **ह्यूएनत्संग** ह्या नांवाचा जो एक बौद्ध यात्रेकरू आला होता, त्यानें 'हीनयान व महायान हे दोन्ही पंथ एकमेकांपासून विभक्त झालेले मला दिसले,' असें स्पष्ट म्हटलेलें आहे. परंतु आपल्याला त्या पंथोपपंथांचा विचार करण्याचें कारण नाहीं. बौद्धधर्माचें खरें स्वरूप व तत्त्वज्ञान काय आहे, तेंच आपल्याला पाहायचें आहे.

ह्या पुस्तकाच्या पहिल्या प्रकरणांत, 'त्रिपिटक' हा बौद्धांचा प्रमुख धर्मग्रंथ आहे असें म्हणून, त्या ग्रंथाची रूपरेषाहि थोडक्यांत सांगितलेली आहे. त्या ग्रंथांत बौद्धधर्माचा मूळ आधार म्हणून किंवा खरा पाया म्हणून चार आर्यसत्यें सांगितलेलीं आहेत. तीं आर्यसत्यें प्रत्यक्ष भगवान् बुद्धांनींच आपल्या पहिल्या पांच शिष्यांना सांगितलीं. (१) दुःख, (२) दुःखसमुदय, (३) दुःखनिरोध, आणि (४) दुःख-निरोधगामिनी प्रतिपत्, अशीं त्या चार आर्यसत्यांचीं नांवें असून, त्या आर्यसत्यांत बौद्धधर्माचें सर्व सार सांठलेलें आहे. ह्या आर्यसत्यांची खरी कल्पना येण्यासाठीं त्यांचीं लक्षणें कळलीं म्हणजे पुरे!

## चार आर्यसत्यें

(१) **दुःख** : जन्म, जरा, व्याधि, मरण, अप्रिय गोष्टी, प्रिय जनांचा वियोग, इष्ट असलेलें न मिळणें इत्यादि गोष्टींमुळें दुःख होतें. ह्या सर्व गोष्टींचें मनुष्यानें ज्ञान संपादन केलें पाहिजे.

(२) **दुःखसमुदाय** : विशिष्ट गोष्टींविषयीं आसक्ति असते. तिला तृष्णा असें म्हणतात. ही तृष्णा वारंवार उत्पन्न होणारी असून, तिचे (अ) कामतृष्णा, (आ) भवतृष्णा, आणि (इ) विभवतृष्णा असे तीन प्रकार आहेत. त्यांचीं लक्षणें पुढीलप्रमाणें—

(अ) **कामतृष्णा** : सुखोपभोगाची लालसा, चैनीची आवड, इत्यादि गोष्टी कामतृष्णेंत मोडतात.

(आ) **भवतृष्णा :** जीवनाची आसक्ति, खूपखूप जगावें, मरूंच नये असें वाटणें, मेल्यानंतरसुद्धां सुख मिळावें म्हणून व्रतेंवैकल्यें, यज्ञयाग, जपतपादि साधनांचा उपयोग करणें, ह्या आणि असल्या आणखी अनेक गोष्टी भवतृष्णेंत मोडतात.

(इ) **विभवतृष्णा :** ही एक विलक्षणच तृष्णा आहे. जीवाला कंटाळून, प्रपंचामुळें वैतागून, जगांतून नाहींसें व्हावें असें वाटणें. कांहींजणांना जी आत्महत्या करण्याची इच्छा होते, त्या इच्छेला नाहींशी होण्याची तृष्णा किंवा विभवतृष्णा असें नांव आहे.

(३) **दुःखनिरोध :** दुःखाचा नाश तृष्णानाशानें होऊं शकतो. इतर कोण-तेहि उपाय निरुपयोगी आहेत. आपण जगांतून नाहींसें झालों तरीहि दुःखांचा नाश होत नाहीं, याची जाणीव होणें व त्याप्रमाणें वागण्याची तयारी करणें याचें नांव दुःखनिरोध.

(४) **दुःखनिरोधगामिनी प्रतिपत् :** तृष्णानाशानें दुःखांचा नाश होतो हें खरें असलें तरी ज्या मार्गांनीं त्या तृष्णांचा नाश करायचा असतो, त्याला दुःखनिरोध-गामिनी प्रतिपत् असें म्हटलेलें आहे. ह्या मार्गाचीं आठ अंगें असून, त्याला अष्टांगिक मार्ग असें म्हणतात.

तीं अष्टांगें व त्यांचीं लक्षणें पुढीलप्रमाणें आहेत.

**अष्टांगिक मार्ग**

(१) **सम्यक् दृष्टि :** संसार हा दुःखमय असून, आत्मा कर्मानुसार बदलणारा आहे असें समजणें ही सम्यक् दृष्टि.

(२) **सम्यक् संकल्प :** एकांतवासाची आवड, भूतमात्रांवर प्रेम करण्याची व दुसऱ्यांना अगर आपणांसहि त्रास न देण्याची इच्छा, ह्या तीन संकल्पांना सम्यक् संकल्प असें म्हणतात.

(३) **सम्यक् वाचा :** असत्य भाषण न करणें, चहाडी न करणें, कठोर शब्दांचा उच्चार न करणें, आणि अकारण बडबड न करणें, ह्या संयमांना सम्यक् वाचा असें म्हणतात.

(४) **सम्यक् कर्म :** कोणाचाहि प्राणघात न करणें, चोरी न करणें, आणि परदारगमन न करणें हे संयम म्हणजे सम्यक् कर्म !

(५) **सम्यक् आजीव :** उपजीविकेसाठीं वाईट मार्गाचा अवलंब न करणें, न्याय्य व योग्य रीतीनेंच चरितार्थ चालविणें, याचें नांव सम्यक् आजीव.

(६) **सम्यक् व्यायाम :** मनांत असलेले कुविचार काढून टाकणें, नसलेले कुविचार मनांत येणार नाहींत अशी खबरदारी घेणें, आणि सुविचार सुचतील असें प्रयत्न करणें याचें नांव सम्यक् व्यायाम.

(७) **सम्यक् स्मृति :** शरीर हें नाशिवंत आहे, तें घाणेरड्या पदार्थांनीं तयार झालेलें आहे, ही जाणीव सदोदित जागृत ठेवून चित्तसंशोधन करणें ही सम्यक् स्मृति होय.

(८) **सम्यक् समाधि :** कामवासनादि मनोविकारांच्या आहारीं न जातां चित्त अखंड सुप्रसन्न राखून सुखदुःख समान लेखून, राग, लोभ, मोह, भय यांपासून अलग होणें, याचें नांव सम्यक् समाधि असें आहे.

## तीन तत्त्वें

वर सांगितलेल्या अष्टांगाचा अवघ्या तीन तत्त्वांत अंतर्भाव केलेला असून, प्रत्येक तत्त्वाला 'शिक्षा' असें नांव दिलेलें आहे. ह्या तीन शिक्षा म्हणजे बौद्धधर्मतत्त्वज्ञानाचा अगदीं अर्कच ! बौद्धधर्मतत्त्वज्ञानाच्या त्या तीन पायऱ्या आहेत, असें म्हटलें तरी चालेल. त्या तीन शिक्षा अशा :

(१) **अधिशीलशिक्षा :** म्हणजे सर्व प्रकारच्या पापांपासून परावृत्त होणें व दुष्कृत्यें न करणें. ह्या शिक्षेंत (अ) सम्यक् वाचा, (आ) सम्यक् कर्म, (इ) आणि सम्यक् आजीव ह्या तीन अंगांचा समावेश होतो.

(२) **अधिचित्तशिक्षा :** म्हणजे पुण्याचा संचय करून चित्तशुद्धि करणें. ह्या शिक्षेंत (अ) सम्यक् व्यायाम, (आ) सम्यक् स्मृति, आणि (इ) सम्यक् समाधि ह्या तीन अंगांचा समावेश होतो.

(३) **अधिप्रज्ञाशिक्षा :** म्हणजे संसार हा दुःखमय आहे हें जाणून परमेश्वर-रूप होणें. ह्या शिक्षेंत (अ) सम्यक् दृष्टि, आणि (आ) सम्यक् संकल्प ह्या दोन अंगांचा समावेश होतो.

## तीन पातकें

बौद्धधर्मानें कायिक, वाचिक आणि मानसिक ह्या तीन प्रकारच्या दहा पातकांचा निषेध केलेला आहे. तीं दहा पातकें पुढीलप्रमाणें आहेत.

(१) **कायिक पापें :** (अ) हिंसा करणें[1], (आ) चोरी करणें, आणि (इ) व्यभिचार करणें.

---

**टीप :** १. हिंदुधर्मांतहि हिंसा निषिद्ध मानलेली आहे. परंतु वेदविहित हिंसा ही हिंसा नव्हे, असें मानलें जातें. म्हणजे यज्ञयागादि कृत्यांत केलेली हिंसा ही हिंसा ठरत नाहीं, असें आपलें तत्त्वज्ञान आहे. परंतु बौद्धधर्मांप्रमाणें तसा भेद केला जात नाहीं. हिंसा मग ती कोणत्याहि कारणानें घडो, ती त्याज्य मानलेली आहे. हा सूक्ष्म परंतु महत्त्वाचा भेद लक्षांत ठेवण्यासारखा आहे.

( २ ) **वाचिक पापें :** ( अ ) खोटें बोलणें, ( आ ) चहाडी करणें, ( इ ) कठोर भाषण करणें, आणि ( ई ) अकारण बडबड करणें.

( ३ ) **मानसिक पापें :** ( अ ) परद्रव्याची इच्छा करणें, ( आ ) रागावणें, आणि ( इ ) नास्तिक असणें. ( नास्तिकता याचा अर्थ कोणत्याहि सन्मार्गाविषयीं शंका घेऊन अविश्वास व अश्रद्धा बाळगणें असा घ्यावयाचा. )

## दुःखाची कारणपरंपरा

संसार हा दुःखमय आहे असें सांगून, त्या दुःखाचें मूळ कशांत आहे हें सांगतांना बौद्धधर्मांप्रमाणें जी कारणमीमांसा केलेली आहे, ती मोठी मार्मिक व सूक्ष्म विवेकशक्तीची साक्ष पटविणारी आहे. सर्व दुःखांचें एकमेव कारण म्हणजे अविद्या! कारण अविद्येपासुन संस्कार, संस्कारापासून विज्ञान, विज्ञानापासून नामरूप, नामरूपापासून षडायतन, षडायतनापासून स्पर्श, स्पर्शांपासून वेदना, वेदनेपासून तृष्णा, तृष्णेपासून उपादान, उपादानापासून भव, भवापासून जन्म आणि जन्मापासून जरा, व्याधि, मरण, शोक, इत्यादि दुःखें निर्माण होतात. अशी ही दुःखाची बुद्धप्रणित कारणपरंपरा आहे! दुःखाचें मूळ कारण अविद्या आहे एवढेंच सांगून ते स्वस्थ बसले नाहींत; तर त्यांनीं त्या अविद्येचाहि खुलासा केलेला आहे. भगवान् बुद्ध म्हणतात कीं, ( १ ) जग हें अनित्य असतांनासुद्धां तें नित्य आहे असें समजणें, ( २ ) आत्मा हा अविनाशी व अविकारी असा नसतांनासुद्धां तो तसा आहे असें मानणें, आणि ( ३ ) संसार दुःखमय असूनहि त्यांतच सर्व सुखांचा सागर सामावलेला आहे असा समज असणें, हें अज्ञान म्हणजेच अविद्या होय. चार आर्य-सत्यें एकदां पटलीं, म्हणजे मग अष्टांगिक मार्गानें ह्या अज्ञानाचा नाश होऊन, प्रज्ञा प्रज्वलित आणि प्रकाशित होते; असा बौद्धधर्मसिद्धांत आहे.

आत्म्यासंबंधानें भगवान् बुद्धांचें मत मध्यममार्गी आहे. त्यांच्या काळीं आत्मा हा शाश्वत आहे असें आग्रहानें प्रतिपादन करणारे विद्वान् होते, त्याचप्रमाणें आत्मा अशाश्वत आहे असें सिद्ध करून देणारे पंडितहि होते! ह्या दोन मतांतराचा नेमका मध्यबिंदु भगवान् बुद्धांनीं शोधून काढलेला आहे. त्यांचें म्हणणें असें कीं, आत्मा हा शाश्वतहि नाहीं आणि अशाश्वतहि नाहीं. तो कार्यकारणभावानें बदलणारा आहे.

## स्त्रीपुरुषांचे भेद व त्यांचीं कर्तव्यें

बौद्धधर्म हिंदुधर्मांप्रमाणें जातिभेद आणि त्यांतील उच्चनीच भाव मुळींच मानीत नाहीं. जातीमुळें कोणी चांडाळहि होत नाहीं आणि कोणी ब्राह्मणहि होत

नाहीं. कर्मानेंच चांडाळ होतो नि कर्मानेंच ब्राह्मण होतो, असें बुद्ध सांगतात.[1] त्यांच्या भिक्षुसंघांत जसे ब्राह्मण होते, तसेच चांडाळहि होते. आचारविचारांच्या आणि वृत्तीच्या भिन्नतेप्रमाणें मात्र स्त्रीपुरुषांचे चार भेद कल्पिलेले आहेत. पण ते भेद म्हणजे जातिभेद अगर वर्णभेद नव्हेत, हें विसरतां कामा नये. स्त्रीपुरुषांचे भेद पुढीलप्रमाणें आहेत.

**पुरुषांचे भेद :** (१) गृहस्थ, (२) उपासक, (३) श्रामणेर आणि (४) भिक्षु.

**स्त्रियांचे भेद :** ( १ ) गृहिणी, ( २ ) उपासिका, ( ३ ) श्रामणेरी आणि ( ४ ) भिक्षुणी.

बौद्ध म्हणविणाऱ्या प्रत्येकानें ( १ ) हिंसा, ( २ ) चोरी, ( ३ ) व्यभिचार, ( ४ ) असत्य भाषण आणि ( ५ ) मद्यादि मादक पदार्थांचें सेवन ह्या पांच गोष्टी वर्ज्य केल्याच पाहिजेत असा बौद्धधर्माचा दंडक आहे. प्रत्येक महिन्यांतील दोन्ही अष्टमी, पौर्णिमा व कृष्ण चतुर्दशी हे धर्मचिंतनासाठीं गृहस्थ आणि गृहिणी यांना खास दिवस नेमून दिलेले असून त्या दिवसांना उपोसथ असें म्हणतात. उपोसथ पाळणाऱ्या गृहस्थास व गृहिणीस अनुक्रमें उपासक व उपासिका अशी नांवें आहेत. गृहस्थास व गृहिणीस सांगितलेल्या वर्ज्यावर्ज्य गोष्टी तर उपासक व उपासिका यांनीं पाळल्याच पाहिजेत; शिवाय आणखीहि चार गोष्टी त्यांनीं केल्या पाहिजेत, असा निर्बंध आहे. त्या म्हणजे ( १ ) दुपारीं १२ नंतर न जेवणें, ( २ ) कामोद्दीपक गोष्टींपासून अलिप्त राहाणें, ( ३ ) उंच आणि मोठ्या बिछान्यावर न झोंपणें, आणि ( ४ ) ब्रह्मचर्य पाळणें, ह्या होत.

### उत्तम मंगलें

सामान्य लोकांसाठीं कांहीं उत्तम गोष्टी बुद्धदेवांनीं सांगितलेल्या आहेत आणि त्यांना त्यांनीं ' उत्तम मंगलें ' असें नांव दिलेलें आहे. त्या उत्तम मंगलांची कल्पना येण्यासाठीं कांहीं मंगलें येथें देतों.

**उत्तम मंगलें :** मूर्खांची संगत न धरणें, सज्जनांची संगत धरणें, थोरथोर विभूतींना मान देणें, योग्य ठिकाणीं राहाणें, पुण्य संपादन करणें, मनाला चांगलें वळण लावणें, खूपखूप विद्या व कला संपादन करणें, सद्वर्तनाची संवय लावणें, जरूर तेव्हांच समयोचित बोलणें, आईबापांची सेवा करणें, बायकामुलांचें संगोपन व संरक्षण करणें, आपलें कर्तव्यकर्म योग्य रीतीनें करणें, दानधर्म करणें, धर्माचरण ठेवणें, आप्त-

---

टीप : १. न जच्चा वसलो होति न जच्चा होति ब्राह्मणो ।
कम्मना वसलो होति कम्मना होति ब्राह्मणो ॥

नातलगांच्या उपयोगी पडणें, पापांचा त्याग करणें, मद्यपानाविषयीं मनाचा संयम करणें, सत्पुरुषांचा गौरव करणें, विनयानें वागणें, सदासर्वदा समाधानवृत्ति ठेवणें, कृतज्ञता बाळगणें, धर्मोपदेश ऐकणें, सहनशील असणें, गोड बोलणें, तपश्चर्या, ब्रह्मचर्य व मागें सांगितलेलीं चार आर्यसत्यें लक्षांत ठेऊन खबरदारीनें वागणें, नोकराचाकरांना चांगल्या रीतीनें वागविणें, प्राणिहिंसा न करणें वगैरे वगैरे उत्तम मंगलें म्हणून कित्येक चांगल्या गोष्टी सांगितलेल्या आहेत.

भगवान् बुद्धांनीं आईबापांना, गुरुजनांना बायकामुलांना योग्यतेनुसार मानानें वागवावें असें सांगितलेंच आहे, पण आपल्या धन्यांशीं व नोकरचाकरांशींहि तितक्याच आदरभावानें वागावें, असेंहि सुचविलेलें आहे. त्यांचा तो सदुपदेश दिशापूजनांत स्पष्ट सांपडतो.

## दिशापूजन

पूजा संपल्यावर ' यानिकानीच पापानि ' असा मंत्र म्हणत आपण हात जोडून प्रदक्षिणा घालतों. तें कां ? आपल्याच सभोंवार अगर देवाभोंवतीं गरगर फिरून प्रदक्षिणा घालणें म्हणजे काय ? त्याचा अर्थ भगवान् बुद्धांनीं मोठ्या मार्मिकतेनें सांगितलेला आहे. ते म्हणतात, प्रदक्षिणा म्हणजे सहा दिशांची पूजा. पण त्या सहा दिशा म्हणजे काय ? तेव्हां ते सांगतात, ( १ ) पूर्वदिशा म्हणजे आईबाप, ( २ ) दक्षिण दिशा म्हणजे गुरु, ( ३ ) पश्चिम दिशा म्हणजे पत्नि, ( अर्थात् स्त्रियांच्या बाबतींत पति. ) ( ४ ) उत्तरदिशा म्हणजे इष्टमित्र, ( ५ ) खालची दिशा म्हणजे सेवक आणि ( ६ ) वरची दिशा म्हणजे साधुसंत, असें समजावें. अशा रीतीनें सहाहि दिशांना नमस्कार करणें, म्हणजे त्या त्या दिशेनें सुचित केलेल्या प्रतिकांना नमस्कार केल्यासारखें होतें. दिशापूजनांत केवढा मोठा व्यावहारिक अर्थ भरलेला आहे पहा ! दिशापूजनाच्या निमित्तानें आपण आपल्या सेवकांनासुद्धां कसें मानानें वागविलें पाहिजे, तें भगवंतांनीं मोठ्या कौशल्यानें सांगितलेलें आहे !

## तीन अवस्था

निर्वाणप्राप्तीसाठीं मनुष्याला तीन अवस्थांतून जावें लागतें. 'पंचस्कंध' ही पहिली अवस्था. ' अर्हत्पद ' ही दुसरी अवस्था. आणि ' निर्वाण ' ही तिसरी व शेवटची अवस्था ! रूप, वेदना, संज्ञा, संस्कार आणि विज्ञान यांना ' पंचस्कंध ' असें नांव आहे.

पृथ्वी, पाणी, तेज, वायु इत्यादिकांपासून तयार झालेली वस्तु म्हणजे रूपस्कंध. सर्व प्रकारच्या मानसिक वेदना म्हणजे वेदनास्कंध. वस्तूंना दिलेलीं नांवें व एक वस्तु दुसऱ्या वस्तूपासून वेगळी आहे हें दर्शविण्यासाठीं त्यांना दिलेलीं नांवें हा संज्ञास्कंध.

सद्गुणांचे मनावर झालेले परिणाम आणि अमुक वाईट अमुक बरें, हें पाप तें पुण्य, वगैरे बऱ्यावाईटाची छाननी करण्याचे मनावर झालेले संस्कार, म्हणजे संस्कारस्कंध. आणि कान, डोळे, नाक, जीभ, शरीराचे इतर भाग आणि मन इत्यादि इंद्रियांनीं होणारें ज्ञान म्हणजे ज्ञानस्कंध होय. हे पांचहि स्कंध वासनायुक्त असले म्हणजे त्यांना उपादान स्कंध असें म्हणतात. वासनारहित असले म्हणजे फक्त 'स्कंध' असें म्हणतात. पंचस्कंधांतील वासनांचा संपूर्ण नाश झाला आणि चित्त निर्विकार झालें, कीं पुढची अवस्था 'अर्हत्पद'!


## दहा संयोजनें

मनुष्याला दहा प्रकारचीं बंधनें ( संयोजनें ) असतात. त्या दहाहि बंधनांपलीकडे जाण्याचें सामर्थ्य अंगी येणें म्हणजे 'अर्हत्पद' प्राप्त होणें होय. (१) आत्मा हा भिन्न पदार्थ नसून तो नित्य आहे, असा समज असणें हें पहिलें बंधन (२) बुद्ध, धर्म आणि संघ ह्या त्रिरत्नांविषयीं अविश्वास असणें, हें दुसरें बंधन. (३) व्रतवैकल्यें करून मुक्ति मिळेल असं मानणें म्हणजे तिसरें बंधन. ( ४ ) कामवासनेच्या आहारीं जाणें, हें चवथें बंधन. ( ५ ) राग असणें, हें पांचवें बंधन. ( ६ ) ब्रह्मलोकादि प्राप्तीची इच्छा करणें, हें सहावें बंधन. ( ७ ) अरूप अशा देवलोकप्राप्तीची इच्छा करणें, हें सातवें बंधन. ( ८ ) अहंकार असणें, हें आठवें बंधन. ( ९ ) चित्ताची चलबिचल होणें हें नववें बंधन. आणि ( १० ) अविद्या म्हणजे अज्ञान, हें दहावें बंधन. हीं दहा बंधनें विवेक-शक्तीनें तोडून जो चित्तशुद्धीच्या जोरावर उद्धाराच्या वाटेनें जाऊं शकतो, त्यालाच पुढें निर्वाणपदाच्या पूर्णानंदाचा सोज्वळ साक्षात्कार घडतो!

वरील बंधनापैकीं पहिल्या तीन बंधनांतून मुक्त झालेल्या माणसाला 'सोतापन्न' असें म्हणतात. त्या अवस्थेंत असतांना मरण आलें तर त्याला मनुष्यलोकीं फार तर सात वेळां जन्म घ्यावा लागतो. पहिलीं तीन बंधनें तोडून रागलोभादि विकारांचा नाश झाला म्हणजे तो 'सकदागामी' ( सुकृदागामी ) होतो. त्या स्थितींत मरण आलेल्यास फक्त एकच वेळ जन्म घ्यावा लागतो; व त्यानंतर त्याला मोक्ष मिळतो. पहिल्या पांच बंधनांचा नाश करणाऱ्याला 'अनागामी' असें म्हणतात. त्या अवस्थेंत अंत झाला तर त्याला ब्रह्मलोकीं जन्म घ्यावा लागतो व मोक्ष मिळतो. आणि सर्व बंधनांच्या पलीकडे जाणें म्हणजे 'अरहा' स्थिति प्राप्त करून घेणें होय. अशाला जन्ममरणाचें भय उरतच नाहीं. तो जीवन्मुक्त होतो! निर्वाणपदाला पोंचतो. निर्वाण किंवा मोक्ष म्हणजे ज्ञानाची परिसीमाच! ज्ञानाची पूर्णानंद स्थिति तीच निर्वाण अवस्था!

बौद्धधर्मतत्त्वज्ञान हें फार गहन तत्त्वज्ञान आहे. तें उच्च तत्त्वज्ञान आहे. परंतु त्या तत्वज्ञानाची सर्वसाधारणपणें ढोबळ कल्पना यावी, या हेतूनें ह्या

प्रकरणांत बौद्धधर्मांतील कांहीं ठळक गोष्टींचाच उल्लेख केलेला आहे. ही माहिती साररूप अर्थात् संक्षिप्त आहे. ती संपूर्ण आहे, असा वाचकांना गैरसमज करून घेऊं नये. बौद्धधर्माची ही तोंडओळख झाल्यावर त्या धर्माचा अधिक परिचय करून घेण्याची इच्छा उत्पन्न व्हावी, हीच लेखकाची खरी इच्छा आहे. असो ! अशा ह्या एका थोर धर्माला अभिवादन करण्यासाठीं आपणहि स्वतःशीं म्हणू या कीं, '**धम्मं सरणं गच्छामि !**' धर्म हें दुसरें रत्न.



## ❁ बाबांची आरती ❁

आरती योगिराजा     लीला अगाध तुझ्या
कशास खेळ करिशी     जीव व्याकुळला माझा ॥

न्याहाळतां तुझें रूप     परब्रह्म तूं दिसशी
नसे तुज आदि अंत     माया जगास दाविशी ॥१॥

भक्त तुझे आवडीनें     गुणगान हें करिती
गाऱ्हाणें ऐकूनि तूं     कामनाहि पुरविशी ॥२॥

भजनाचा नाद भक्तां     एका क्षणांत लाविसी
मार्ग मोक्षदायक     साऱ्या जगास दाविशी ॥३॥

नाहीं तुज ओळखिलें     परब्रम्ह म्हणून पुजिलें
ईश्वरी तव अवतार     पाहून मी दंग झालें ॥४॥

—विमल देशमुख
एम. ए. बी. टी

# भक्त भानुदास

* * * * * * * * * * * * * * * *

एकेकाळीं पैठण क्षेत्रांत एक सूर्योपासक ब्राह्मण रहात असे. तो ज्ञानी व पवित्र होता. त्याला एक मुलगा झाला. त्याचा व्रतबंध झाल्यानंतर तो बापाजवळ अध्ययन करूं लागला. अभ्यासाच्यावेळीं एकदा तो ब्राह्मण मुलावर रागावला व त्याला शिक्षा करण्यास प्रवृत्त झाला. त्या भीतीनें मुलगा रुसून घरांतून पळून गेला. लपून बसण्यास निवांत असें एखादें स्थळ शोधीत हिंडतां हिंडतां त्या मुलाला भूमीमधील एक देऊळ दिसलें. त्या निर्जन देवळांत प्रवेश करून तो तेथें लपून बसला.

तें देऊळ फार प्राचीन असून त्यांत सूर्यनारायणाची मूर्ति बसविलेली होती. त्या मुलानें सूर्यास शरण जाऊन त्याची सेवा आरंभिली. त्याची निष्ठा पाहून भगवान नारायण त्याला प्रसन्न झाला. त्यानें त्याला दर्शन देऊन अभय वरदान दिलें आणि पांडुरंगाची भक्ति करण्याची अनुज्ञा केली.

एके दिवशीं तो ब्राह्मणपुत्र सहज देवळाबाहेर आला तो त्याला एका द्विजानें ओळखिलें. त्यानें त्याला हाका मारितांच तो लागलीच आपल्या देवळांत दडून बसला.

## भाग्यवान भानुदास

आपला मुलगा नाहींसा झाल्याबद्दल त्याचे आईबाप उद्विग्न होऊन मुलाचा तपास करीत होते. त्यांना तो द्विज भेटून मुलाची बातमी लागली. त्या द्विजाला बरोबर घेऊन त्याचे आईबाप आणखी कांहीं गांवकऱ्यांसह त्या देवळाकडे गेले. त्यांनीं त्या देवळाचा शोध लावून दिवट्या घेऊन त्यांत प्रवेश केला. आंत शिरतांच आपला पुत्र नारायणमूर्तीच्या चरणावर मस्तक ठेवून निजला आहे असें त्यांच्या दृष्टीस पडलें. पुत्राला पाहून आईबापांना गहिंवर आला. त्यांनीं त्याला पोटाशीं धरून विचारलें "बाळा; तूं या ओसाड देवळांत तहान भूक कशी भागवितोस?" त्यावर त्या मुलानें सांगितलें "येथें नित्य एक ब्राह्मण येऊन मला क्षीरपान करवितो." तो ब्राह्मण साक्षात् सूर्यच असावा अशी खात्री होऊन त्याच्या आईबापास त्याला सूर्यनारायण प्रसन्न असल्याचा विश्वास उत्पन्न झाला. ते त्या मुलाला घरीं घेऊन गेले. सूर्याच्या प्रसादानेंच आपला पुत्र पुनः आपल्याला भेटला असें समजून त्यांनीं त्या मुलाचें नांव भानुदास असें ठेविलें. भानुदास कदाचित पुन्हा रुसून जाईल म्हणून त्याच्या बापानें त्याला पुनरपि अध्ययन सांगण्याचा खटाटोप केलाच नाहीं. प्राक्तनावर भरवसा धरूनच त्याच्या आईबापांनीं काळजी करण्याचे सोडून देऊन आपल्या मुलासह ते स्वस्थ चित्तानें प्रपंच चालवूं लागले.

भानुदास मोठा झालासें पाहून त्याच्या आईबापांनीं त्याचें लग्न करून दिलें. पुष्कळ काळ भजनांत घालविल्यानंतर त्याचे आईबाप आयुष्य सरतांच इहलोक सोडून गेले. मातापित्यांच्या मरणामुळें आपल्या अंगावर प्रपंच पडला असें पाहून भानुदास गडबडला नाहीं. त्याला मुलें बाळें होतीं तरी तो कोणाच्याच लोभांत गुंतला नाहीं. कुटुंबपोषणाकरितांहि तो कांहीं व्यवसाय करीना. त्याचीं बायकापोरें फार तळमळ करूं लागली, तरी त्यामुळें व्यथित न होतां तो भजनरंगांत रंगून राहिला.

त्याच्या हीन गृहस्थितीबद्दल दया धरून कांहीं सद्गृहस्थांनीं आपापसांत शंभर रुपये जमविले आणि ते भानुदासाच्या हवालीं करून त्यांनीं त्यास सांगितलें, "या भांडवलावर तुम्ही कापड खरेदी करून व्यापार करा. मुद्दल कायम ठेवून होईल त्या फायद्यानें कुटुंबसंरक्षण करा."

## कुटुंबपोषणार्थ व्यापारउदीम

हा विचार भानुदासास पसंत पडला. भांडवलवाल्यांनीं भानुदासास इतर उदम्यांच्या हवालीं केले आणि त्यास संभाळण्यास सांगितलें. व्यापाऱ्यांनीं त्यास अशी सूचना दिली कीं, "मालाच्या मानानें फायदा आकारून किंमत सांगावी. कोणाशीं खरें भाषण करूं नये. नक्की किंमत सांगितली तर व्यापारांत नुकसान होण्याचा संभव आहे."

व्यापाऱ्यांची ही सूचना भानुदासास रुचेना. असत्य भाषण करून हवा-तसा नफा मिळविणें हें त्याला पटेना. मुद्दल व नफा यांचा गिऱ्हाइकाजवळ सत्य खुलासा करून जें काय मिळेल तेवढेंच मिळवावयाचें असा त्यानें संकल्प ठरविला. कोणी गिऱ्हाईक आलें असतां तो त्यांना अमुक मुद्दल व त्यावर अमुक नफा असा एकच जबाब सांगून हरिभजन चालू करी. त्याच्या एकजबानीची ख्याती होऊन लोकांवर त्याचें वजन पडलें. बहुतेक गिऱ्हाईक त्याच्याच दुकानीं लोटूं लागलें. लोभी बनून असत्य भाषण करणाऱ्या उदम्यांचा माल पडून राहूं लागला. त्यामुळें ते उदमी भानुदासाचा द्वेष करूं लागले. ते त्याच्यासंबंधाने अनेक किटाळें उठवूं लागले.

एके समयीं ते सर्वजण फेरीला गेले असतां बाजार आटोपून ते वस्तीकरितां एका देवळांत बिऱ्हाड करून राहिले. त्या दिवशीं त्या गांवांतील दुसऱ्या एका देवळा-मध्यें एका हरिदासाचें कीर्तन होतें. दुकान आटोपून भानुदास सर्व व्यवसायबांधवां-बरोबर बिऱ्हाडीं गेला. बरीच रात्र झाल्यावर त्यानें आपल्या सोबत्यांना कीर्तनास चलण्याचा आग्रह केला. त्यांतून कोणीहि आपला माल सोडून कीर्तनास येईना. तेव्हां त्यांना भानुदास म्हणाला "तुम्ही येथेंच निजतां तर माझा माल तरी संभाळा;

मी कथेला जातों." त्याला यावेळीं नडवावें या मतलबानें ते दुर्जन बोलले "मालाचा फायदा मात्र तूं घेणार आणि त्याची राखण आम्ही करणार काय? तूं मोठा सत्यवचनी व देववेडा आहेस. तूं आपला माल बरोबर वागीव नाहींतर दुसऱ्या एखाद्या सुरक्षित स्थळीं नेऊन ठेव. आमचें अंग दुखत आहे. आम्हांस झोंप लागून येथें कांहीं दगा झाला तर?"

उदम्यांच्या भाषणाची मुळीच पर्वा न धरितां भानुदास हरिनामसंकीर्तनास जाण्याला उत्सुक झाला. त्याचा सर्व भाव पांडुरंगाच्या ठिकाणीं जडला, तो कापडाच्या गठ्ठयांचा मोह धरून नामसंकीर्तनाचा कसा त्याग करील? मालावर पाणी सोडून भानुदास कीर्तनाला गेला. त्यानें हरिदासाला नमस्कार घातला. तो दिवस एकादशीचा असल्यानें त्याला कीर्तनश्रवणामुळें बहुत आनंद वाटला.

## भानुदासाची भगवंताला चिंता

इकडे त्याच्या दुष्ट सोबत्यांनीं आपला डाव साधला. त्यांनीं त्याचा माल वाहणारा घोडा सोडून दिला. त्याचें कापडाचें दिंड एका गारेंत नेऊन टाकिलें. भानुदास परत येऊन विचारील तर त्याला दरवडा पडलासें सांगून घरीं परत लावून द्यावयाचें, आणि तो निघून गेला म्हणजे मग त्याचें दिंड आपसांत वाटून घ्यावयाचें. असा संकल्प ठरवून ते दुर्जन फार फार आनंदित झाले. त्या सर्व दुर्मतींनीं भानुदासाचा माल गर्तेत टाकून दुष्ट दुर्योधनाचे अनुकरण केलें, असें पाहतांच विश्वसाक्षी परमात्मा भानुदासाच्या रक्षणास सज्ज झाला. भानुदासाचा अश्व कोठेंतरी भडकेल असें जाणून पांडुरंगानें ब्राह्मणाचें रूप धरून तो घोडा धरिला. साक्षात् लक्ष्मी ज्याच्या चरणाचें ध्यान करिते; योगी तपी ज्याच्या चिंतनांत तल्लीन असतात; तीर्थें, व्रतें, यज्ञ यानाही ज्याचें आकलन होत नाहीं तो भक्तकाज कैवारी परमात्मा भानुदासाचें तट्टू पकडून चवाठ्यावर मोतद्दार होऊन बसला.

इकडे व्यवसाची लोक देवळामध्यें भानुदासाची वाट पाहत बसले. भानुदासाला आपल्या मालाची वाताहत समजली म्हणजे तो तळमळेल एवढ्या कल्पनेनेंच त्याना आनंदाच्या उकळ्या येत होत्या. त्यांचा तो पापजन्य आनंद पाहतांच परमात्मा त्यांच्यावर कोपला. ईश्वराच्या क्षोभानें त्या देवळावर खरोखरीच दरवडा आला. चोरांनीं त्या व्यापाऱ्यांचा सर्व माल लुटून घोडीही पळवून नेलीं. सर्व व्यापाऱ्यांना आपल्या कृतकर्मांचा पश्चात्ताप होऊन ते कपाळाला हात लावून बसले. ते मोठ्यानें रडूं ओरडूं लागले; पण त्यांची दाद घेण्यास कोणीच धावून येईना.

चार घटका रात्र उरली आहे तों कीर्तन आटपून भानुदास हरिनाम जपत देवळाकडे येऊं लागला. चवाठ्यासन्निध येतांच भानुदासानें आपला घोडा ओळखिला. भानुदास

घोड्याजवळ जातांच तो खेंकाळला. घोड्याच्या गळयाला धोतराचा वेढा देऊन त्याला धरून बसलेल्या मनुष्यास कांहीं शोधक प्रश्न करावा म्हणून भानुदास शब्दोच्चार करणार तोंच तो मोतद्दाररूपी परमपुरुष तेथेंच अदृश्य झाला. तो चमत्कार पाहतांच भानुदास आश्चर्य पावला. नंतर आपला घोडा घेऊन तो बिन्हाडीं गेला.

बिन्हाडाजवळ जातांच आपल्या व्यवसायबंधूंचा रूदन स्वर ऐकून त्यानें त्यांची हवाल विचारली. भानुदासास पाहतांच त्या व्यापाऱ्यांनीं आपली दुष्ट कृति आपण होऊनच कबूल केली आणि दरोड्याबद्दल विलाप चालविला. त्यांच्या भाषणाचा अर्थ जाणून भानुदासानें घोडा धरून बसलेल्या पांडुरंगास ओळखिलें. पांडुरंगानें त्याच्याकरिता श्रम घेतले याबद्दल त्याचें मन द्रव पावलें. ज्याच्या योगानें पंढरीनाथास कष्ट पडतात तसलें कृत्य न करण्याचा निर्धार करून तो त्या व्यापाऱ्यांना बोलला, "बांधवहो; तुम्ही आपल्या नुकसानाबद्दल दिलगीर होऊं नका." इतकें सांगून त्यानें त्या खाचींतून आपलें दिंड बाहेर काढिलें. त्यांतील सर्व वस्त्रें, घोडा व शिलकींतलें द्रव्य त्यांना अर्पण करून भानुदास आपल्या घरीं चालता झाला.

तेव्हांपासून तो कीर्तन करूं लागला. त्यानें प्रपंचावरील आसक्ति सोडिली. तो उदासीन वृत्तीनें वागूं लागला. तो आषाढी कार्तिकीला पंढरीची वारी करूं लागला. त्यानें अयाचितवृत्ति स्वीकारली. त्यानें विकल्पाचा त्याग करून सर्वत्र समबुद्धि धरिली. वैराग्यभरित होऊन प्रेमोल्हासानें तो सर्व काळ भजनकर्मांत घालवूं लागला.

## रामराजाचा गर्व

पंढरपूरचा एक ब्राह्मण द्रव्यइच्छा धरून नगर, पट्टणें हिंडतां हिंडतां विद्यानगरास येऊन पोहोंचला. त्यानें तेथील रामराजाची भेट घेऊन त्याला आपली इच्छा कळविली. रामराजा देवीभक्त असून अतिथीचा योग्य सत्कार करीत असे. त्यानें ब्राह्मणाची पूजा केली आणि आपल्या दैवतास नैवेद्य अर्पण करण्याकरितां तो त्या ब्राह्मणासमवेत राजाईच्या मंदिरांत गेला. या देवीचें मंदिर फार प्रेक्षणीय होतें. त्याच्याभोंवतीं मनोहर पुष्पवाटिका तयार केली होती. सर्व देवळाला रुप्याच्या पाण्याचा मुलामा केलेला होता. अंतरगाभाऱ्यांत जगदंबेची मूर्ति विराजमान झालेली होती. विद्यानगरचे सर्व लोक देवीच्या पूजेला येत असत. राजानें देवीची षोडशोपचारें पूजा करून आरती ओंवाळिली. नंतर सर्वत्रांना प्रसाद वाटून रामराजा त्या क्षेत्रस्थ ब्राह्मणास गर्वोक्तीनें म्हणाला "भटजी; त्रिभुवन धुंडाळलें तरी या राजाईसारखें दैवत सांपडणार नाहीं. तुम्ही पंढरीत राहून ज्या विठोबाला भजतां त्याला या राजाईप्रमाणें उपचार नसतील. दुर्बळ ब्राह्मण ज्याचें पूजन करणार त्या पांडुरंगाला मौल्यवान् वस्त्रें व भूषणें कोठून असणार?"

राजाचें निंदास्पद भाषण ऐकून तो क्षेत्रवासी ब्राह्मण रागावून बोलला, "पंढरीक्षेत्र डोळ्यांनीं न पाहतां आपण आपल्याच देवळाचें स्तोत्र गातां हा तुमचा भ्रम आहे. तुमच्या देवळाला रुप्याचें पाणी दिलें आहे; पण आमचे सर्व क्षेत्रच विश्वकर्म्यानें सोन्याच्या कोंदणांत बसविलें आहे. तेथें कल्पतरूंची रांगच्यारांग लागून गेली आहे. पंढरीमध्यें हिरे व परिस खड्यांप्रमाणें रस्तोरस्ती पसरले आहेत. विजे-सारख्या दिव्य पताकांनीं आकाशमार्ग चमकून राहिला आहे. तेथें कामधेनूंचीं खिल्लारें सुखानें वास्तव्य करितात. तेथील वृंदावनें रत्नजडित असून प्रेमळ वैष्णवांच्या कीर्तन-गजरांनीं सर्व क्षेत्र सतत नादित झालेलें असतें. आपल्या दर्शनानेंच पतितांना पावन करणारी चंद्रभागा आपल्या जीवनामृतानें क्षेत्रस्थांना सदैव आरोग्य देत आहे. गरुड-पारावर रंभादिदेवांगनांचें नृत्य चालू असतें. द्वारामध्यें गंधर्वांचें मधुर गायन चालू असतें क्षीरसागरांत वास करणाऱ्या देवाधिदेवानें पुंडलीकाकरितां पंढरींत अक्षय्य ठाणें दिलें आहे. कंबरेवर दोन्ही हात देऊन पंढरीनाथ सदैव उभा आहे. भक्तजनांचें संकट हरण करण्यास तो प्रभु अक्षय्य तत्पर आहे. त्याचें सौंदर्य लक्ष्मीलाही खालीं पाहण्यास लावणारें आहे. त्याच्या मुकुटावरून कोटिसूर्य ओवाळून टाकावेत अशी त्याची प्रभा आहे. त्या शामवर्णी पांडुरंगानें पीतांबराची कास घातली असून त्याचे कान मकराकार दिव्य कुंडलांनीं झळकत आहेत. पांडुरंगाचें मनोहर मुख पाहण्याकरितां इंद्रादिदेवही तेथें अहोरात्र तिष्ठत राहतात. कैलासनाथ त्याच्या नांवाचा अक्षय जप करितो. श्रुति, शास्त्रें, ब्रह्मदेव यांनाहीं त्याच्या गुणांचा अंत लागत नाहीं. पंढरीसारखें क्षेत्र, चंद्रभागेप्रमाणें तीर्थ व पांडुरंगाच्या तोडीचें दैवत अनंतकोटी ब्रह्मांडांतही सांपडावयाचें नाहीं. तुम्ही आपली आपण व्यर्थ स्तुति करितां. तुम्ही ज्या राजाईचा महिमा वर्णन करितां ती राजाई नित्य पंढरीस येऊन सडासंमार्जन करीत असते."

## रामराजा संतापला

ब्राह्मणाचें भाषण ऐकतांच रामराजा खवळला. राजाईच्या निंदेमुळें तो त्या ब्राह्मणास ठार मारण्यास सिद्ध झाला. तरी पण ब्रह्महत्येच्या पातकास भिऊन राजा त्या ब्राह्मणास अरण्यांत नेऊन सोडूं लागला. तेव्हां त्या ब्राह्मणानें प्रार्थना केली कीं, "आपण स्वतः पंढरीस यावें. मी वर्णन केल्याप्रमाणें पंढरीचें स्वरूप नसेल, तुमची राजाई तर तेथें दासीचें काम करतांना न दिसेल तर आपण मला हवा तो दंड करावा."

ब्राह्मणाची प्रतिज्ञापूर्वक भाषा ऐकून राजानें पंढरीस जाण्याचा संकल्प केला. आपल्या वर्णनाप्रमाणेंच सर्व देखावा दिसावा या हेतूनें त्या भाविक ब्राह्मणानें पांडुरंगाची मानसिक प्रार्थना केली कीं, वाडवडिलांनी पुरून ठेविलेलें धन शोधण्यास दुर्दैवी गेला असतां त्याला जसे धनाच्या ऐवजीं कोळसे दिसतात त्याप्रमाणेंच विकल्पानें

पछाडलेल्या माणसांना पंढरीक्षेत्र सामान्य नगराप्रमाणें भासतें. वस्तुतः त्या ब्राह्मणानें सांगितल्याप्रमाणेंच पंढरीचें सत्यस्वरूप आहे असें संतसाधु सांगतात. संतसाधूंच्या वर्णनाप्रमाणें पंढरी न दिसेल तर त्या ब्राह्मणाला दंड भोगावा लागेल हें जाणून पांडुरंगांनीं पंढरीचें सत्यस्वरूप प्रकट करून दाखविलें. रामराजा पंढरीच्या जवळ येतांच तो हत्तीवर चढून लांबूनच पंढरीची रचना अवलोकन करूं लागला. त्यानें दृष्टि फेंकतांच त्याला देवळाचा कळस दिसला. नक्षत्रांनीं वेष्टित अशा चकाकणाऱ्या चंद्राप्रमाणें सुवर्णमय मंदिरांनीं वेष्टित असा लखलखीत कळस पाहतांच राजा आश्चर्य पावला. त्याला अनुताप वाटून तो लागलीच हत्तीवरून खालीं उतरला. पुढील मार्ग चालून तो पंढरीस येऊन पोंचला. कामधेनूसारख्या उदंड गायी, कल्पतरूंचीं वनें, हिऱ्यासारखें असंख्य घोंडे, हंस, मयूर यांचें नृत्य, तपस्व्यांचीं अनुष्ठानें, ब्राह्मणांचें वेदाध्ययन, विष्णुभक्तांचें कीर्तन, संतमुखांतील आत्मचर्चा आणि चोहोंकडील सोनेरी देखावा या योगानें राजा आपल्या मनांत चूर झाला. त्यानें त्या ब्राह्मणाच्या पायावर डोकें ठेवून चंद्रभागेचें स्नान केलें; आणि तो देवदर्शनास चालला. गाभाऱ्यांत पाऊल टाकतो तों त्या राजास पांडुरंगापुढें विनित झालेले इंद्रादि देवगण दिसले. पांडुरंगाच्या चरणीं रावणाच्या अष्टसिद्धीच्या घोळक्यांत त्यानें राजाईस प्रत्यक्ष अवलोकन केलें. विद्यानगरीमध्यें आपण ज्या कुलस्वामिनीची पूजा करितों तिला अंगण झाडतांना पाहून राजा मनामध्यें विस्मित झाला. त्यानें राजाईस पंढरपुरास हलकी कामें करण्याचें कारण विचारिलें. देवीनें उत्तर केलें " तुझें मन वृथा अहंतेने व्यापिलें आहे. माझ्यासारख्या हजारों दासी या पंढरीत राबण्याकरितां येतात." तिच्या उत्तरानें निर्गर्व होऊन राजा पुढें गेला तों त्याला गायन करीत असलेले नारद व तुंबर दिसले. त्याची दृष्टी भ्रमली. त्याला सर्व नारीनर चतुर्भुज दिसूं लागले. तो तसाच पुढें मूर्ति शेजारी गेला तों तिच्या तेजानें त्याचे डोळे दिपून गेले. त्यानें लागलीच बरोबरच्या ब्राह्मणाचा हात धरिला. कांहीं वेळानें त्याच्या दृष्टीत सामर्थ्य येऊन त्यानें परब्रह्माची मूर्ति न्याहाळून पाहिली. आणि देवाच्या चरणाला मिठी घातली. उंबरांतील किड्यांना बाहेरचे जग दिसतांच ते जसे वेडे होतात त्याप्रमाणें विद्यानगरच्या बाहेरील पंढरी पाहतांच रामराजा वेडा झाला. तो त्या द्विजाला म्हणाला, " मी अविद्येच्या योगानें गुरफटून गेलों होतों; पण तुझ्यामुळें माझा भ्रम जाऊन मी पावन झालों.

## दोष पहाणाऱ्यांचा

रामराजाला अशा प्रकारचा चमत्कार दिसून पंढरीच्या वैभवाबद्दल त्याची खात्री होतांच ती सर्व दिव्य रचना नाहींशी झाली. त्याला पुनः पूर्वीप्रमाणें मृत्तिकेच्या भिंती दिसूं लागल्या. वास्तविक पाहतां राजाला प्रथमतः जशी पंढरी दिसली तसेंच तिचें खरें

स्वरुप आहे. ती दगडामातीची दिसणें हा तिचा दोष नव्हे. तो पाहणारांच्या कर्माचा दोष होय. तिच्या अद्‌भुत रचनेबद्दल रामराजा अत्यंत विस्मित झाला. भवानीची पूजा करण्यांत विशेष महत्व नाहीं असें त्याला आतां वाटूं लागलें. क्षीरसागराचा त्याग करून कोण स्नान करील? ज्याला अमृताच्या सरोवराचें दर्शन झालें तो दिव्य औषधी घेण्याच्या भरीस कशाला पडेल? कल्पतरू जवळच सांपडण्यासारखा असतां बाभळीच्या सावलीखालीं बसणें हा मूर्खपणाच नव्हे काय? कामधेनूची प्राप्ति झाल्यावर शेळीची पूजा करणें अप्रशस्तच होय. याच न्यायानें रामराजाला पांडुरंगाचें दर्शन होतांच त्याची देवी-उपासनेची इच्छा नष्ट झाली. त्यानें पांडुरंगाची प्रार्थना केली कीं, "हे देवाधिदेवा, आपणास विद्यानगराला घेऊन जावें, असा माझा हेतु आहे. मला शरणागताला अभय देऊन आपण ही माझी इच्छा पूर्ण करावी." राजाची मनीषा जाणून देव बोलले, "मी तुझ्या गांवीं येण्यास तयार आहे. पण विद्यानगरास पोहोंचेपर्यंत तूं मला वाटेंत कोठें उतरतां कामा नये. तूं जर मला कोठें मध्येंच भुईवर ठेवशील तर मी तेथेंच राहीन." देवाचें बोलणें राजानें मान्य केलें. त्यानें ठिकठिकाणीं आपले सेवक उभे करून पांडुरंगाला हातोहातीं विद्यानगरास नेलें. देवाचे पुजारी व इतर द्विज यांचा राजापुढें नाइलाज होऊन मूर्ति नेल्याबद्दल ते सर्व माशा मारीत स्वस्थ बसले. राजानें नगरामध्यें मूर्तीची स्थापना केली. तो राजाईचे सर्व उपचार पांडुरंगाला करूं लागला. पांडुरंगाच्या सेवेंत कांहीं अंतर पडूं नये म्हणून तो फार दक्ष राहिला.

इकडे आषाढमासीं शेंकडों भक्तजन पंढरीच्या यात्रेस जमले. राजावांचून असलेली प्रजा, भ्रताराविरहित स्त्री; चंद्ररहित नक्षत्रें जशीं निस्तेज दिसतात तद्वत् त्या संतजनांना विठ्ठलरहित पंढरी उदास दिसूं लागली. रामराजानें विद्यानगरास नेलेली प्रभूची मूर्ति परत कशी आणावी म्हणून सर्व भक्तलोक विचार करूं लागले. मूर्ति परत आणण्याकरितां रामराजाकडे जाण्यास कोणी तयार होईना. जो तो कांहींतरी मुद्दे सांगून समाधान मानून घेऊं लागला. सर्वांच्या अंतःकरणांत तळमळ सुरूं झाली; पण मूर्ति परत आणण्याचें अवसान कोणांतही दिसेना.

### भानुदासाची प्रतिज्ञा

इतक्यांत भानुदासानें पुढें होऊन मूर्ति परत आणण्याची प्रतिज्ञा केली. प्रतिज्ञा शेवटास गेली नाहीं तर आपण आपला जीव ठेवणार नाहीं असें उद्गार काढून भानुदास तावडतोब विद्यानगरास निघाला.

त्यानें शहरांत जाऊन तेथील लोकांना मूर्तिस्थापनेची जागा विचारिली. राजाच्या भीतीनें त्याला खरें ठिकाण कोणी सांगेना. मग भानुदासानें गुप्तपणें शोध चालविला. रामराजानें आपल्या एकांतमंदिरांत पांडुरंगाची मूर्ति ठेविली होती. राजा स्वतः पूजन करून गेला म्हणजे मंदिराचे दरवाजे बंद केले जात असत. राजावांचून कोणालाही

विठ्ठलाचें दर्शन होत नसे. द्वारावर द्वारपाळ नेमून कडेकोट बंदोबस्त केला होता. हा सर्व प्रकार भानुदासाला गुप्त चौकशीनें समजून आला. त्यामुळें आनंदित होऊन भानुदासानें एकांतांत पांडुरंगाचें चोरून दर्शन घेण्याचें आपल्याशीं ठरविलें.

अर्धरात्र झाल्यावर भानुदास राजमंदिराच्या द्वाराशीं गेला. त्यावेळीं पहारेकरी घोरत पडले होते. भानुदासानें दाराला हात लावतांच कुलपें गळून पडलीं. भानुदासानें आंत प्रवेश करून विठ्ठलाला नमस्कार घातला. प्रभुदर्शनानें त्याला प्रेमाचा गहिंवर येऊन त्यानें बहुत प्रकारें देवाची प्रार्थना केली. तो देवाचीं वर्में काढून त्याला लाजवूं लागला. तो देवाच्या ठिकाणीं हरतऱ्हेचे आरोप स्थापूं लागला. त्याच्या भावयुक्त भाषणास भुलून परमात्म्यानें आपल्या गळ्यांतील नवरत्नांचा हार त्याच्या गळ्यांत घातला. ते दोघेजण एकमेकांस आलिंगून स्फुंदन करूं लागले. अखेर सजा येईल या भीतीनें पांडुरंगानें भानुदासास बाहेर लावून दिलें. भानुदास बाहेर पडतांच मंदिराचीं कवाडें पूर्वीप्रमाणें आपोआप बंद झालीं.

## शेवटीं रत्नहार सांपडला


सकाळ होतांच रामराजा स्नान करून पूजेकरितां मंदिरांत आला. देवाच्या गळ्यांतील हार नाहींसा झालेला पाहून त्यानें द्वारपाळांना चोप देऊन हाराचा शोध लावण्यास सांगितलें. चोरीचा तपास लावण्याकरितां शिपाई लोक घरोघर झाडा घेऊं लागले. झाड्यापासून कांहीं निष्पन्न झालें नाहीं तेव्हां ते पादचारी रस्तोरस्ती चोराचा शोध करीत हिंडूं लागले. फिरत फिरत गंगातीरावर प्राप्त होतांच राजदूतांनीं भानुदासास पाहिलें. भानुदास गळ्यांत हार घालून नामस्मरणांत गर्क होते. दूतांनीं तो हार ओळखिला आणि ते भानुदासास पकडून नगरांत घेऊन गेले. भानुदासास चतुर्भुज केलेला पाहून त्रिविध जनांच्या दूषणास आरंभ झाला. दूतांनीं तो हार राजाच्या स्वाधीन केला व धरून आणलेल्या चोरास शिक्षा सांगण्याविषयीं विनंती केली. राजानें चोराला न पाहातांच फाशीची शिक्षा सांगितली. भानुदासानें दूतांची विनंति केली कीं, "माझा अंतकाळ तर जवळच आला. आतां मला पांडुरंगाचें शेवटचें दर्शन करवा म्हणजे मी सुखानें मरेन." दूतांनीं ही विनंती मान्य करून राजाची आज्ञा घेतली आणि भानुदासास मंदिराकडे नेलें. भानुदासानें हात जोडून देवाला सांगितलें "मी तुला येथून नेण्याकरितां आलों हें पाहून त्वां मला राजाकरवीं दंड करण्याची खाशी युक्ति काढलीस. आतां तुला नेण्याकरितां जो भक्त येथें येईल त्याचा असाच प्राण घेऊन तूं खुशाल मंदिरांत राजविलास भोगीत रहा. असेंच मी तुला शपथ घालून सांगतों. असाच गुप्त संकेत करून तूं माझ्या गळ्यांत हा नवरत्नांचा हार घातलास काय ! कसेंही असलें; तूं पांडुरंग आमच्या सेवेला कंटाळला असलास; राजभोगामुळें तूं दीनाविषयीं बेफिकीर झाला असलास तरी कोणत्याही जन्मीं मी तुला सोडणार नाहीं."

असें बोलत असतां भानुदासास हुंदका आला. त्यानें प्रभुपुढें नमस्कार घातला. इतक्यांत शिपायांनीं त्यांस दरडाविलें आणि तेथून ओढून शूळ पुरलेल्या जागीं नेलें. ते राजसेवक भानुदासाला उचलून शूलावर चढवणार तों भानुदास पांडुरंगास स्मरून म्हणाला "पांडुरंगा माझ्यावर आकाश कडकडून पडलें तरी अंतःकरणांत मी तुलाच आठवणार? सप्तसमुद्रांचा समरस झाला तरी मी तुला सोडणार नाहीं. तुझ्यावरून मी आपला देह ओवाळून टाकिला आहे. सर्व पृथ्वीचा लय होईल, पंचभूतें प्रळय पावतील, वडवानल तिन्हीं भुवनें खाऊन टाकील अशा काळींही मी तुलाच जिवलग समजून राहीन."

भानुदासाची ही निर्वाणीची वाणी ऐकून भक्तवत्सल परमात्मा द्रवला आणि असा चमत्कार घडला कीं, त्या पुरलेल्या शूलास पालवी फुटली व फुलें आलीं. शूलाचा अकस्मात वृक्ष झाला, हें वर्तमान दूतांनीं राजास कळविलें. तें झाड पाहतांच राजाला भानुदासाचा अधिकार कळला. राजानें त्याला वंदन करून राजमंदिरांत नेलें. मंदिरांतील मूर्ति पाहतांच भानुदासानें सद्गदित होऊन देवाला मिठी मारिली. पांडुरंगानें त्याला उचलून पोटाशीं धरिलें आणि आपणास स्कंधावर धारण करून पंढरीस न्यावयास सांगितलें. देवाच्या या वियोगानें राजा दुःख करूं लागला. देवांनीं त्याला आपलें रूप हृदयांत स्मरण्यास सांगून शांत केलें. प्रभूची मूर्ति एकट्याला उचलून कशी नेतां येईल म्हणून भानुदासानें देवाला विचारिलें. तेव्हां देवांनीं सांगितलं "मी सर्वस्वी तुझ्या आधीन आहे. माझें सामर्थ्य तेंच तुझें सामर्थ्य आहे." असें बोलून पांडुरंगानें सूक्ष्म रूप धारण केलें. भानुदासानें त्यास संबळींत घातलें. ती संबळी गवाळ्यांत बांधून भानुदास देवाला घेऊन चालले. वाऱ्याचा अफाटपणा विस्तृत आहे तरी पण पंख्याचें अवसान पाहून वायु जसें आपलें मर्यादित रूप भासमान करितो त्याप्रमाणें भक्ताच्या सामर्थ्यास अनुरूप असें सूक्ष्म रूप धारण करणाऱ्या विश्वव्यापकाला स्कंधावर घेऊन जातां जातां भानुदास पद्मालयास येऊन पोंचला. त्या ठिकाणीं संबळी खालीं ठेवून भानुदास स्नान करूं लागला. इतक्यांत देवानें आपलें भव्य रूप प्रगट केलें. वरील पूड डोक्यावर राहिले. खालील पुडाचा चुरा झाला. भानुदास आंघोळ आटोपून संबळीजवळ येतात तों तें विशालरूप पाहून घाबरले. पांडुरंगानें त्याला सांगितलें, "तूं अगदीं चिंता करूं नको. तूं पुढें जाऊन माझ्या आगमनाची वार्ता कळीव. म्हणजे शेंकडों साधुसंत मला सामोरे येऊन घेऊन जातील. आज दिवस उत्तम आहे. आजच माझी स्थापना करा."

पंढरींतील भक्तजन भानुदासाची वाटच पाहात होते. तोंच भानुदासानें येऊन त्यांना पद्मालयांतलें वृत्त कथन केलें. ती खातमी ऐकतांच शेकडों वैष्णवभक्त मोठ्या

थाटानें पद्मालयास गेले. त्यांनीं तेथें पांडुरंगाचें दर्शन घेऊन त्यास रथांत बसविलें आणि मोठ्या सन्मानानें पंढरपुरास आणिलें. महाद्वारामध्यें देवाला पालखींत बसवून मिरवीत मिरवीत सिंहासनावर नेऊन ठेविलें. लागलीच अभिषेक, मधुपर्क होऊन ब्राह्मणांचा मंत्रघोष चालू झाला. वैष्णवांचीं कीर्तनें सुरू झालीं. वस्त्रालंकार व षोडशोपचार यांसह देवाचें पूजन झालें. सर्व नारीनर मिळून भानुदासाचें स्तवन करूं लागले. गांवामध्यें कोणीं साखरा वाटल्या; कोणीं ब्राह्मणभोजनें केलीं. चवदा वर्षें वनवासांत घालवून रामचंद्र अयोध्येला परत येतांच लोकांना जसा आनंद झाला; अगस्तीच्या पोटांतून समुद्राची सुटका होतांच मेघांना जसा आल्हाद प्राप्त झाला; त्याप्रमाणें क्षेत्रवासी लोक आनंदानें डोलूं लागले. वसंताच्या दर्शनानें सुशोभित दिसणाऱ्या वनस्पतीप्रमाणें भक्तजन शोभूं लागले. शरीरांतील प्राण परत आला असतां इंद्रियें जशी सावधान होतात त्याप्रमाणें पंढरीनाथाच्या आगमनानें तेथील लोक स्वस्थ मानस होऊन हरिगुण गाण्यांत तल्लीन होऊन राहिले.



लहान मुलांच्या आंकडीवर
जुनें आणि प्रसिद्ध औषध
जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी
सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.
: स्टॉकिस्ट :
कांचनलाल वडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.

# आधुनिक संत स्वामी रामदास

—आप्पाराव

• **स्वामी रामदास यांच्या स्वर्गारोहणाचें वृत्त आमच्या वाचकांस यापूर्वी विदीत झालेलें आहेच. गेल्या जुलै महिन्यांत दोन दैदिप्यमान तारे निखळून पडले! फार मोठ्या योग्यतेच ते सत्पुरुष होते. स्वामी शिवानंद व स्वामी रामदास.**

**श्री.** शांतिलाल शहा यांनीं स्वामी रामदास यांच्या पूर्वायुष्यासंबंधीं एक इंग्रजी लेख 'प्रेरणा' या इंग्रजी मासिकासाठीं लिहिला असून त्याचा भावार्थ आमच्या वाचकांसाठीं पुढें देण्यांत येत आहे.

"स्वामी रामदास यांची व माझी पहिली भेट १९३८ सालीं झाली. त्यांचें पूर्वाश्रमीचें नांव होतें विठ्ठलराव, वडिलांचें नांव होतें बाळकृष्णराव व आईचें नांव होतें ललिताबाई. त्यांचा जन्म १८८४ सालीं बंगलुरजवळील होसदुर्ग नामक एका खेड्यांत झाला. दुय्यम शिक्षण संपवून पुढील शिक्षणासाठीं ते मुंबईत आले आणि व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल स्कूलमध्यें दाखल झाले. तेथें स्पिनिंग व विव्हिंगचा अभ्यासक्रम पूर्ण करून ते नोकरीधंद्यास लागले. लग्नकार्य झालें व मद्रास, त्रावणकोर, गुलबर्गा, गदग, कोईंबतूर नडियाद व अहमदाबाद वगैरे ठिकाणी असलेल्या गिरण्यांतून त्यांनीं सुमारें चौदा वर्षें नोकरी करण्यांत घालविलीं.

## नोकरी धंदा

नंतर आपण कांहींतरी स्वतंत्र व्यवसाय करावा असे वाटून त्यांनीं मंगलूर येथें एक कारखाना सुरू केला. परंतु त्यांत त्यांना यश मिळालें नाहीं. त्यामुळें त्या व्यवसायाला त्यांनीं रामराम ठोकला.

हा उद्योग चालू असतां त्यांना १/२ असे अनुभव आले कीं, त्यामुळें त्यांचें लक्ष देवाकडे वळले. त्यांच्या वडिलांनीं त्यांना रामनामाचा मंत्र देऊन ठेवला होता. त्याला त्यांनीं 'ओम' या मंत्राची जोड देऊन ते नेहमीं 'ओम् श्रीराम जय जय राम' चा उच्चार करूं लागले. रात्रंदिवस त्याच त्या मंत्राचा सतत जप. तो त्यांचा जिवलग स्नेही झाला.

एके दिवशीं त्यांचें मन रामनामानें इतकें कांहीं व्याकूळ झालें कीं, सर्वस्वाचा त्याग करून कुठें तरी रानावनांत पळून जावें असें त्यांना तीव्रतेनें वाटूं लागलें. मग काय करायचें ? एके दिवशीं पहाटेच्या प्रहरीं आपली पत्नी व कन्या यांचा त्याग करून ते घराबाहेर पडले. गौतम बुद्धानें जो मार्ग स्वीकारला तोच मार्ग त्यांनीं स्वीकारला. 'देवाचिया भेटीसाठीं पडाव्या जिवलगांच्या तुटी !'

## संन्यासग्रहण

घराबाहेर पडल्यानंतर त्यांनीं संन्यास घेतला व रामदास या नांवानें ते ओळखले जाऊं लागले. त्या प्रसगीं त्यांनीं तीन प्रतिज्ञा केल्या. [ १ ] हा देह रामसेवेंत व रामनामाच्या अखंड जपांत खर्च करावयाचा. [ २ ] प्रत्येक स्त्रीला मातेसमान मानावयाचें [ ३ ] केवळ भिक्षेवर रहावयाचें.

सारा भरिभार रामावर टाकून त्यांनीं देशभर पर्यटण सुरू केलें. ते या प्रवासांत खूपच हिंडले फिरले. सर्व तीर्थांच्या यात्रा केल्या. वाटेंत कोणी संन्यासी किंवा साधुपुरुष भेटला म्हणजे त्याच्याबरोबर तो जाईल तिकडे जावयाचें. रानावनांतून कांट्याकुट्यांतून कशाचीही पर्वा न करतां भटकावयाचें. या भटकंतींत त्यांना आलेले अनुभव विविध तसेंच विचित्र प्रकारचे होते. "भगवंताच्या शोधार्थ" या आपल्या इंग्रजी ग्रंथांत ते सारे अनुभव त्यांनीं सुंदर रीतीनें रेखाटले आहेत. 'इन क्वेस्ट ऑफ गॉड' व "इन् धी व्हिजन ऑफ गॉड" हीं त्यांचीं दोन्हीं पुस्तकें दैवी अनुभवांनीं ओतप्रोत भरलेलीं आहेत. तीं वाचीत असतां वाचक भारावून जातो. रामाला त्यांनीं सर्वार्पण केलें होतें. ती शरणागति सर्वस्वीं व सर्व परीनें केलेली होती.

## रमण महर्षींची भेट

एकदां आणि आयुष्यांत एकदांच त्यांची व रमण महर्षींची भेट झाली. त्यांनीं रामदासांवर एकच कृपा कटाक्ष टाकिला व त्या कृपा कटाक्षानें ते भारले गेले ! त्या कटाक्षानें त्यांच्या चैतन्य निर्माण केलें. त्यांना सामर्थ्यसंपन्न केलें. त्यांना जो वैभवश्री हवी होती ती प्राप्त झाली. या दोन सत्पुरुषांची पुन्हां कधींहि भेट झाली नाहीं. परंतु ती एकमेव भेट रामदासांना जीवनभर पुरून उरेशी होती. सर्व जग म्हणजे ब्रह्म आहे, प्रत्येक प्राणिमात्रांत रामसखा आहे याची त्यांना पूर्णत्वानें जाणीव झाली. सारे जग त्यांना राममय वाटूं लागलें.

## आनंदाश्रमाची स्थापना

१९२४ सालीं रामदासांनीं कंभणगड स्टेशनापासून कांहीं मैलांच्या अंतरावर 'आनंदाश्रम' स्थापन केला. कृष्णाबाई माताजी त्या आश्रमाची सर्व व्यवस्था पहात

असत. स्वामीजी १९३८ मध्यें मुंबईत आले तेव्हांच प्रस्तुत लेखकाची व त्यांची पहिली भेट झाली. त्यांच्या चेहऱ्यावर त्यावेळीं किती दैवी तेज खेळत होतें. त्यानंतर १०।१२ वर्षे ते आपला आश्रम सोडून बाहेर कोठेंही गेले नाहींत. १९५४–५५ सालीं त्यानीं जगाचा प्रवास आरंभिला. त्यांना सारें जग डोळ्यानी पहायचें होतें. श्रीरामाचीं विविध देशांतील व प्रांतांतील विविध रुपें, त्यानीं पाहिलीं ते जेथें जेथें गेले तेथें तेथें त्यानीं जनतेचें मार्गदर्शन प्रवचन–व्याख्यान रूपानें केलें. जग सुधारावें, शहाणें व्हावें ईश्वरमय व्हावें, व सुखासमाधानांत नांदावें हीच त्यांची एकमेव आकांक्षा होती.

## जागतिक युद्ध होईल का?

त्या काळांत त्यांना कोणीतरी प्रश्न विचारला कीं. "स्वामीजी! जागतिक युद्ध होण्याचा संभव आहे कां?" त्यावेळीं त्यांनीं नकारार्थी उत्तर दिलें. तो नकार लेचापेचा नव्हता. निश्चित होता. फ्रान्समध्यें ते त्यावेळीं होते.

असे होते स्वामी रामदास! जगाच्या कल्याणासाठीं सदैव झटणारे व रामनामांत गुंग झालेले! महात्मा गांधीप्रमाणें रामनामाचा महिमा त्यांनीं पूर्णत्वानें ओळखला होता.

---

—जो मनुष्य सर्वांशी बंधुभावानें वागतो व सर्वांवर प्रम करतो तो याच देहीं याच डोळां मोक्ष मिळवीत असतो.

—सत्पुरुष हे चंदनाच्या वृक्ष–प्रमाणें असतात. चंदनाच्या झाडाच्या सुगंध या झाडाखालून जाणाऱ्या येणाऱ्यास व जवळपासच्या लोकांस जसा मिळतो तसाच तो झाडाची मोड तोड करणाऱ्यालाही मिळतो.

—आकाशांतील ढग याचना न करतां पर्जन्यवृष्टि करतात. त्याचप्रमाणें सद्गुणी माणसें दुसऱ्यांनीं अपेक्षा केली नसतांही परोपकार करीत असतात.

—आपल्या विचारांची दिशा बदला' मी अमर आहें. मी आत्माराम आहें असें स्वतःला नित्य पढवीत रहा. मग पहा! तुम्हीं मृत्यूवर जय मिळवूं शकाल. व या व परलोकांत अढळ पद मिळवाल.

—स्वामी शिवानंद

# 'केल्यानें होत आहे रे!'

सुमारें आठशें वर्षांपूर्वीची जुनी गोष्ट आहे. विद्यानगरमध्यें त्याकाळीं स्थीरचित्त नामक राजा राज्य करीत होता. मोठा प्रजाहित दक्ष.

त्याला अनेक शत्रू होते. एके रात्रीं तो आपल्या राजवाड्यांत स्वस्थ झोपी गेला असतां दरवाजावरील पहारेकऱ्यांस पैसे चारून कांहीं चोर राजवाड्यांत घुसले. त्यांनीं प्रथम प्रवेश केला तो राजाच्या शयनागारांत! त्याची मुस्कटदाबी करून ते त्याला घेऊन एका उंच डोंगरावर गेले. त्या डोंगरावर एक प्रचंड गुहा होती. त्या गुहेंत नेऊन व त्याचे हातपाय बांधून त्यानीं त्या राजाला बंदिस्त करून ठेविलें. त्याला गुंगीचे औषध दिल्यामुळें त्याला हालचाल करतां येणें शक्य नव्हतें. गुहेच्या तोंडावर तें बंद करण्यासाठीं त्यांनीं एक प्रचंड शीळा आणून ठेविली व कायमचा बंदोबस्त करून टाकिला.

कांहीं तासांनी त्या राजाची गुंगी नाहींशी झाली तेव्हां तो इकडेतिकडे पाहूं लागला. सर्वत्र अंधकार! आतां काय बरं करायचं! मोठाच पेचप्रसंग! त्याचे हातपाय बांधलेले होते. हालचाल करतां येत नव्हती. आपण कोठें आहोंत हेंच त्याला उमगेना. त्यानें उभें रहाण्याचा कसून प्रयत्न केला परंतु त्यांत त्याला यश आलें नाहीं. त्याला भयंकर तहान लागली होती. डोळयांच्या पापण्या जड झाल्या होत्या. सारा देहच सुन्न व अवजड वाटूं लागला होता. त्याच्या कानांत कसली तरी गर्जना होऊं लागली होती. आपल्या छातीवर कोणी तरी धक्के मारीत आहे, असा भास त्याला होऊं लागला!

"हे देवा! तूं मला अशा स्थितीप्रत आणून मला मारायचें ठरविलें आहेस का?" असें कांहीं तरी तो जेमतेम पुटपुटला.

त्याबरोबर "होय! होय!" असा आवाज त्याला ऐकूं आला.

त्याचबरोबर "अरे! मी यमराज आहें. तुझे प्राण हरण करण्यासाठीं मी येथें आलों आहें!" असाहि ध्वनि त्याच्या कानांत पडला.

राजा एकदम दचकला! तो म्हणाला, "हें काय बरें! यावेळीं प्राण कसलें आणि काय कसलें! मी अजून तरूण आहे. माझी बायको फार सुंदर व बुद्धिमान आहे. माझा सुंदर मुलगा आहे. तो सिंहासारखा शूर आहे. मी ज्या प्रदेशावर

राज्य करतों तो भूभाग सुपीक व बहुरंगी आहे. मला माझ्या त्या प्रदेशाचा व प्रजेचा मोह सोडतां येण्यासारखा नाहीं. त्यांच्यासाठीं मला अजून पुष्कळ करायचें आहे. तेव्हां मी एवढ्यांतच या जगाचा निरोप घेऊन कसें बरें चालेल ? छे; छे; मी येऊं शकत नाहीं; तूं आपला आल्या वाटेनें परत जा कसा !

तो आवाज कांहीं न बोलतां नुसतें खो ! खो ! खो ! करून हसला ! त्यावर राजा म्हणाला, अरे ! असं काय करतोस ? तूं मला घेऊन जाणारच असशील तर सांग बघूं नक्की केव्हां घेऊन जाणार तें !"

" पहांटेपूर्वी एक तास अगोदर !" उत्तर आलें.

हा निर्वाणीचा खलिता ऐकून राजाचा थरकांप झाला. त्याच्या हृदयाचे ठोके झपाझप पडूं लागले. त्याला कांहीं सुचेना. त्याचें सारें शरीर कंपायमान झालें. आपणास जावें लागणार तर !

इतक्यांत त्याला आईची व आईनें मृत्यूसमयीं दिलेल्या एका मंत्राची आठवण झाली. कोणतेही व कितीही विकट संकट येवो. मी देत आहे तो मंत्र सतत उच्चारीत जा व त्याप्रमाणें वागत जा. असें ती म्हणाली होती. कोणता तो मंत्र ?

' करोमि !' मी करीनच ! तो कृतिचा मंत्र होता.

त्या मंत्राचा त्यानें तीनदां उच्चार केला. इतक्यांत एका सर्पानें त्याच्या पायाला चावा घेतला !

' अरे कर्मा ! मंत्राचें हेंच का श्रेय ?' राजा मोठ्यानें ओरडला.

इतक्यांत कांहीं चिंता नाहीं. घाबरूं नकोस. त्या मंत्राचा पुन्हां त्रिवार जप कर ! असा आवाज त्याच्या कानीं पडला. तो आवाज त्याच्या परिचयाचा त्याच्या मातेचाच होता.

करोमि ! करोमि !! मी तें करणारच ! करणारच !

कर ! कर ! वाट कुणाची पहातोस ? असें शब्द त्याच्या कानावर आदळले.

राजानें धडपड करून आपले हात दोरखंडांतून सोडवून घेतले. स्वस्थ हात जोडून बसून राहिल्यानें काय होणार आहे ? केले पाहिजे; करीत राहिले पाहिजे. शरिराला गति दिली पाहिजे.

ता बंधनांतून मोकळा झाला. पायाच्या बोटाला सर्प चावला होता तें बोट त्यानें तात्काळ तरवारीनें तोडून टाकिलें. त्यानें अंगावरील शेल्याच्या तुकड्यानें तें बोट गच्च बांधून टाकिलें.

" कर ! कर !" हा आवाज सतत त्याच्या कानीं पडतच होता.

शरीर बंधनांतून मोकळें झालें परंतु ते तहानेनें व्याकूळ झालें होतें. करोमि! करोमि!! तरीहि राजाचा मंत्रोच्चार चालू होता व त्याला "कुरु! कुरु!" हे उत्तर मिळत होतें. त्यामुळें स्फूर्ति मिळून तो कांहीं ना कांहीं करीत होता.

आणि 'करीत रहा करीत रहा' हा आवाज त्याच्या कानांत सतत पडतच होता.

गुहेचें तोंड बंद होतें, तेथें मोठी शीळा आडवी पडली होती. ती दूर करणें जरूर होतें. त्यासाठीं सर्व शक्ति व सारें बळ एकत्र करून त्यांनीं त्या शिळेवर आपले मस्तक जोरानें हाणले. या उद्योगांत प्राण गेला तरी बेहत्तर! असा त्यानें निर्धार केला होता.

ज्या चोरांनीं ती शिळा गुहेच्या तोंडावर ठेविली ते घाईत होते. त्यामुळें ती त्यांनीं बरोबर बसविली नव्हती, धडक बसतांच ती हालली व पलिकडे जाऊन आदळली.

गुहेचें तोंड मोकळें झालें! किती आनंद झाला आहे राजाला!

राजा गुहेबाहेर आला आणि सभोंवार पाहूं लागला. तो सुप्रभातीचा सुंदर समय होता. वारा झुळझुळ वहात होता. राजाच्या अंगांत नव चैतन्याचा संचार झाला.

राजा तेथून निघाला आणि आपल्या राजधानींत आला. करोमि! करोमि! मी करणार! मी करणार! मी हात जोडून स्वस्थ बसून रहाणार नाहीं हाच त्याचा जीवनमंत्र होता. तो त्यानें जीवनभर आचरणांत आणिला.

त्यामुळें मानसन्मान, कीर्ति व सुखसंपदा यांचा लाभ त्याला भरपूर प्रमाणात झाला; तसाच तो तुम्हां आम्हांला होवो.


✳ उत्कृष्ट कागद ✳ आकर्षक रचना

✳ स्वच्छ व सुबक छपाई

**बॉम्बे सेंट्रल प्रेस**

मुरलीधर टेंपल कंपाऊंड, ठाकुरद्वार पोस्टाशेजारीं

जगन्नाथ शंकरशेट रोड, ठाकुरद्वार मुंबई २

# नामदेवांची वाणी

अनुवादक : गणेश विष्णु कवटिकर, एम्. ए.

: १ :

## कहाँ लौं आरती दास करै

सकल भुवन ही ज्याची ज्योति स्फुरण पावत आहे त्या प्रभुची आरती कोणत्या ज्योतीनें म्यां दासानें करावी ? सप्त सागर ज्याच्या चरणीं निवास करीत आहेत त्या प्रभूला स्नान घालण्याकरितां जल-कुंभ कोठून घ्यावेत ? अठराभार बनस्पति ज्याच्या शरीरांवरील रोमपंक्ति आहे त्या प्रभूच्या मस्तकावर वाहण्याकरितां फुलें कोठून घ्यावीत ? अनेक कोटी वाद्यें ज्याचा जयजयकार करीत आहेत त्या प्रभूचा जयजयकार कोणत्या झांजांनीं करूं ? ज्याच्या नखांची शोभा अनेक सूर्यांच्या दीप्तिसमान आहे अशा त्या प्रभूला ओवाळणी-ओवाळण्यासाठी दीप हातीं धरावा तर तो आहे कुठें ? तिन्ही लोकांना जो भोजन पुरवितो त्या प्रभूला कोणता नैवेद्य दाखवावा ? शिवसनकादिक आणि ब्रह्मादिक ऋषी व नारदमुनी ज्याचें ध्यान करतात, विशाल गगनाच्या थाळींतील नक्षत्रगण-तारागण हे ज्याचे मोती आहेत, चंद्र-सूर्य ज्याच्या निर्मळ ज्योती आहेत आणि चौऱ्यांशी लक्ष योनी जो व्यापून राहिला आहे अशा त्या प्रभूचें केवळ यशोगान नामदेव करीत आहे.

: २ :

## ऐसो ब्रह्म अखंड निरवाण पद

ज्यावर श्रीगुरुकृपेचा वरदहस्त आहे असा क्वचित् एखादा मनुष्य अशा अखंड निर्वाणपद परब्रह्माला-ईश्वराला जाणतो :

नारीविना तो ( परमात्मा ) पुरुष होय. ( अर्थात्, प्रकृतिभिन्न ते एक चैतन्य आहे. ) बीजाविना तो वृक्ष होय. पशुविना गाय, उन्हाशिवाय छाया आणि प्रेमसंबंधा-शिवाय लागलेलें तें मनोज्ञ सुंदर फल होय.

ते ( परब्रह्म ) पायाशिवाय चालतें, कानांवाचून ऐकतें, धाग्याशिवाय विणतें, वाराशिवाय मोजतें, डोळ्याशिवाय कोणतीहि अदृश्य वस्तु पाहातें.

तें बोटाशिवाय जप करतें, ध्यान, चिंतन अगर अनुसंधान केल्यावांचून ब्रह्मांडाच्या समष्टिगत अंतर्भावांत विलीन होते, तालाशिवाय वाजते, आकाशाशिवाय गर्जते आणि गळ्याशिवाय कोणताहि राग गातें.

ते तोंडाशिवाय बोलतें, हाताशिवाय जोखते, सांगितल्याशिवाय उमजूं शकते आणि दिवस नसतां म्हणजे रात्रींहि पाहूं शकते. असें हें अखंड असूनहि इंद्रियाकडून होणाऱ्या क्रिया इंद्रियावाचून करणारें परब्रह्म अवर्णनीय आहे.

त्याला जन्म नाहीं, मृत्यू नाहीं त्याला येणें जाणें कांहीं नाहीं. त्याला सुख–दुःख प्रेम–वैर या भावना त्रासवूं शकत नाहींत.

त्या परब्रह्माला आशा, चिंता आणि भय नाहीं. संयोग–वियोगापासून तें अलिप्त आहे. त्याला बाप नाहीं, आई नाहीं. आरंभ तोच आणि अंतहि तोच. त्याची स्थापना अगर प्रतिष्ठा करतां येत नाहीं. नामदेव म्हणतात, त्या परमात्म्याचा हा सर्व आश्चर्यकारक खेळ आहे.

( आणि वाचका, तूं त्याची सहज ऊर्मि आहेस ! )—**संपादक**

: ३ :

## तत्त गहनको नाम है

जें अतर्क्य, दुर्गम व गूढ आहे त्याचें नांव परतत्व. यासाठीं तूं त्या परतत्वाचें–परमेश्वराचें भजन कर. त्याचा लीला–सागर अथांग आहे. त्याचें सामर्थ्य, त्याची गति एवढी आहे कीं तिचें कोणी अनुमानहि करूं शकत नाहीं. सुवर्णाचे मेरुपर्वत, हत्ती, घोडे यांचे कोणी दान केलें किंवा कोणी गाई दान दिल्या तरी हें सर्व दान परमेश्वराच्या नामस्मरणाची बरोबरी करूं शकत नाहीं. शम आणि दम यांचा अवलंब न करतां रसना म्हणजे वाणी ईश्वराच्या नामस्मरणाकडे लावल्यामुळें जन्म–मरणाचे फेरे पुनः पुनः होणार नाहींत. ज्याप्रमाणें मृग संगीतानें अल्पकालांत मुग्ध होऊन जातो आणि त्या अवस्थेंत बाण लागला तरी तो त्या संगीताच्या ध्यानामध्येंच मुग्ध होऊन राहातो किंवा भुंगा फुलांत शिरल्यानंतर त्याचा वर्ण त्या फुलासारखा होतो त्याप्रमाणें दासानुदास असलेल्या या नामदेवांचें मन यापुढें परमेश्वर चरणांचा आश्रय सोडणार नाहीं.

: ४ :

## गोविंद मेरा रीझै साचै


माझा प्रभु गोविंद सत्याच्या ठिकाणीं प्रसन्न होतो. मूर्ख आणि धोकेबाज लोकांची संगत त्याला आवडत नाहीं. परमेश्वराच्या ठिकाणीं मन अनुरक्त होत नाहीं.

तोपर्यंत हृयें तर कोणी गायन केलें किंवा कोणी नर्तन केलें तरी ते व्यर्थ होय. जोपर्यंत एकाद्या स्त्रीबद्दल तिच्या प्रियकराला प्रेम वाटत नाहीं तोपर्यंत त्या कामिनीनें अनेक शृंगार केलें तरी त्याचा काय उपयोग? अंतःकरणानें निर्मळ आहेत अशा लोकांचाच तो परमेश्वर अंगीकार करतो. हृदयांत वास करणाऱ्या त्या प्रभूजीला नामदेव जाणतात.

: ५ :

## भाई रे, इन नैनन हरि देखौ

हे बांधवा! तूं या डोळ्यांनीं परमेश्वराचें दर्शन घे. परमेश्वर–भक्ति आणि साधु–संगति घडेल तो दिवस धन्य समज. ईश–प्रेमानें जे नाचतात ते चरण चरण धन्य होत. परमेश्वर पूजा करतात ते हात धन्य होत. साधुसंतांच्यापुढें जे नम्र होते तें मस्तक धन्य होय. तीच जिव्हा धन्य होय कीं जी हरिनामाशिवाय दुसरा शब्द बोलत नाहीं. जग ही एक बाजारपेठ आहे. सर्वजण या ठिकाणीं व्यापारासाठी आले आहेत. ज्यांनीं जसें कर्म केलें त्याप्रमाणें त्यांना प्राप्ति झाली. मूर्ख मात्र पूंजी गमावून बसला. आत्मस्वरूपी ब्रह्मानें हा देह धारण केला आहे. त्या आत्मस्वरूपांत तूं माझ्या परमेश्वराला पहा. नामदेव म्हणतात, तूं आत्मसमर्पण कर. परमेश्वराची भक्ति कर. यांशिवाय अन्य विचार करूं नकोस.



---

मनुष्याच्या जीवनाचे तीन प्रकार होतात : भिक्षा, धंदा आणि चोरी.

भिक्षा म्हणजे समाजाची जास्तीत जास्त सेवा करून समाजापासून केवळ शरीर–धारणापुरतें कमींत कमी घेणें. तेंहि नाइलाजास्तव आणि उपकृत–भावनेनें.

धंदा म्हणजे समाजाची विशिष्ट सेवा करून त्याचा योग्य मोबदला मागून घेणें.

चोरी म्हणजे समाजाची कमींत कमी सेवा करून किंवा सेवा केल्याचें नाटक करून अथवा मुळींच सेवा न करतां आणि कधीं कधीं तर प्रत्यक्ष नुकसान करूनहि समाजापासून जास्तींत जास्त भोग मिळविणें.

# श्री साईची प्रार्थना

—दत्तात्रेय नागले

हे प्रभो देवाधिदेवा साईनाथा, माझ्या जीवाच्या जिवलगा सर्वेश्वरा तूं लगेश्वर सर्व प्राणीमात्रांचा सर्व चराचर विश्वाचा प्रभू आहेस, सुखकर्ता पोषणकर्ता दाता आहेस. तुझा पवित्र आणि सुखदायक असा स्पर्श मला माझ्या अंगाला माझ्या हातांना झाला म्हणजे किती आनंद होतो! तुझ्या त्या परम पवित्र चरणांचा स्पर्श किती कल्याणदायी गोड आहे, तो मला सदैव लाभो. तुझी अखंड अविस्मरणीय आनंद आणि सुखकारक अशी सेवा मला जन्मोजन्मी लाभो. तुझें तें मोक्षदायी आनंदमय रूप माझ्या नेत्रांना सदैव दिसो. तुझ्या सेवेंत मी कधींच खंड पडूं देणार नाहीं माझा देह मी नेहमी निष्कलंक पवित्र ठेवून तुझी मनोभावें सेवा भक्ति तुझें पूजन आणि भजन करीत राहीन.

असत्य विचारांना आणि विकारांना मी माझ्या मनांतून हांकलून देईन! व त्या ठिकाणीं तुझी स्मृती तुझी मूर्ती यांना जागा देईन, तुझें ध्यान तुझें नामसंकीर्तन करीत राहीन, माझ्या मनांत तुझ्या शिवाय कोणी स्मरीत नाहीं.

तूं सत्यस्वरूप असून प्रभुचाहि प्रभू आहेस! माझ्या अंतःकरणांतील सर्व दुष्ट विचारांना मी घालवून देऊन आपलें भक्तिरूप पुष्प मी सदैव प्रफुल्लीत ठेवीन, कारण माझ्या हृदय मंदिराच्या अगदीं आंतील गाभाऱ्यांत तुझी बैठक आहे! मी माझ्या प्रत्येक कामांत तुझें स्वरूप व्यक्त करून तुझ्या त्या पवित्र मंगल नामाचें चिंतन सुरू ठेवीन, कुठलेंहि काम करण्यास तुझ्यामुळेंच मला शक्ति मिळते व म्हणून त्या तुझ्या-पासून मिळालेल्या शक्तिचा मी मुळींच दुरुपयोग करणार नाहीं. तूं सर्व शक्तिमान प्रभू आहेस म्हणून मी तुला सारखा स्मरतो आहे, तुला पहातों आहे. कारण तुला पहावें तिकडे तूं आहेस, माझ्या प्रत्येक हालचालीवर तुझें पूर्ण लक्ष आहे! किंबहुना तुझ्याच आज्ञेनें मी सर्व कांहीं करीत आहे! सर्व कांहीं तूंच करीत आहेस. मी उगाच निमित्ताला कारण आहे!

माझी सर्वस्वी चिंता तूं वहात आहेस. मीं तुझा चरणांचा दास आहे. तुझी सेवा हें माझें कर्तव्य आहे, म्हणूनच मी या जगांत वावरतों आहे! जिकडे पहावें तिकडे तूं परमेश्वर भरलेला दिसत आहेस आणि म्हणूनच तुला पुन्हा पुन्हां शरण येत आहे!

माझें ध्येय फक्त एकच. तें म्हणजे तुझी श्रद्धापूर्वक भक्ति करणें, तुझ्या नामाचं गुणगान गाणें तुझें भजन करणें. यांतच मला खरा आनंद मिळत आहे. तुझ्या नामांत अशी कांहीं जादू भरलेली आहे कीं तें सतत घेत गात राहिल्यानें सर्व पापांचा विघ्नांचा चक्काचूर होऊन जातो !

ज्याचे मुखीं तुझें तें परममंगल नाम सतत घोळत असतें त्याला तूं कधींच विसरणार नाहींस त्याचे ठायींच तुझा वास असतो; म्हणून म्हणतों मीं कुठल्या प्रकारची काळजी कां करावी ? तूं जर माझा सर्व भार सांभाळतो आहेस तर मग मी कां काळजी करावी. तसेंच तूं जर सर्व दाता आहेस तर मी तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणाला शरण जावूं ? माझें सर्वस्व तूंच आहेस ! तूंच सर्व समर्थ आहेस, दयाळू आहेस, ममताळू आहेस, तुला शरण आला आणि वाया गेला असा एकहि जीवप्राणी सांपडणार नाहीं, म्हणून तुला मी अगदीं मनःपूर्वक शरण आलों आहे.

मी तुझे कितीहि गुण गाईले तरी ते अपुरेच पडणारे आहेत. हे प्रभो ! साई देवा ! तुझे माझ्यावर अनंत उपकार झाले आहेत. माझी पत्नी भयंकर आजारां-तून बरी झाली ती आपल्याच कृपा प्रसादानें, माझ्यावर पुष्कळ प्रकारचीं संकटें आलीं पण ती तुझ्या कृपाप्रसादानेंच टळली, तुझ्या नामजपानेंच मी तरलों आहे ! माझ्या मनींच्या पुष्कळ लहान मोठ्या आकांक्षा तूं पूर्ण केल्यास व करीत आहेस. एक दिवस तूं मला स्वप्नांत येऊन सांगितलेंस कीं तूं असा माझ्या मागून ये मी पुढें आहे त्याप्रमाणें मी आपल्या मागोमाग तुझ्या मार्गानें येत आहे ! तुझ्याच आधारानें चालतो आहे. काम करतों आहे. तूं पुढें होऊन माझा जीवनमार्ग मला निर्विघ्न करून देत आहेस व त्या मार्गानें मी येत आहे ! कारण त्या मार्गानें जाणेंच श्रेयस्कर आहे, सुख आहे, कल्याण आहे. तुझ्या पाठोपाठ चालण्यांत कसलीच भिती अगर संकट येणार नाहीं हें मला तूंच सांगितलेंस व मी तें आचरण्याचा प्रयत्न करीत आहे, हे देवा साईनाथा किती अनंत उपकार तूं माझ्यावर केले आहेस, ते मी कधींच विसरणार नाहीं. आतां तुझ्याजवळ एवढेंच मागणें आहे कीं तुझी लीला तुझें गुणगान गाण्याचें सामर्थ्य मला दे, व तें तूं देशील याची खात्री आहे. प्रणाम ! शतशः प्रणाम ! !

उवा घालविण्यासाठीं खात्रीलायक ठरलेलें 'लायसॉफ तेल' वापरा.
गिरगांव : बापट ब्रदर्स — दादर : वसंत फॉर्मसी

# शिर्डी येथील श्रीपुण्यतिथी उत्सव

श्रीसच्चिदानंद सद्गुरु साईबाबा महाराज मु. शिर्डी ता. कोपरगांव, जि. अहमदनगर यांच्या ४५ व्या पुण्यतिथीचा उत्सव श्रींचे समाधी मंदिरात आश्विन शु. ९ शुक्रवार दिनांक २७ रोजी सुरू होऊन आश्विन शु. १२ सोमवार दि. ३०।९।६३ रोजीं गोपालकाला दही हंडी होऊन समाप्त झाला. मुख्य दिवस आश्विन शु. १० दिनांक २८-९-६३ शनिवार ( दसरा ) विजयादशमी हा होय. चालू सालीं या उत्सवास भक्तांची गर्दी थोडी कमी प्रमाणांत होती. याचें कारण एकतर पंचांगाचा मतभेद. दुसरें कारण अतिशय महागाई, अतिवृष्टी हें असावें. तरीपण मुंबई, पुणे, ठाणे, मद्रास, म्हैसूर, आंध्र, वऱ्हाड, मध्यप्रांत, मराठवाडा, खानदेश, नगर, सोलापूर विजापूर अशा ठिकाणाहून बरेच भक्तलोक आले होते.

उत्सवाकरितां मुद्दाम तीन मोठे मांडव, दोन लहान मांडव व ध्वजा, पताका, कमानी, तोरणें, विजेच्या दिव्यांची रोषनाई, स्वच्छता, पिण्याचे पाणी, राहण्याची, जेवणाफराळाची, आंघोळीची व्यवस्था संस्थानकडून उत्तम ठेवण्यांत आली होती. उत्सवाचा कार्यक्रम दिनांक २७-९-६३ शुक्रवाररोजीं ( अखंड नामसंकीर्तन २४ तास तसेंच श्रीसाईसच्चरित्र अखंड अध्याय वाचन २४ तास ) सकाळीं ६ वाजतां फोटोची पोथीची मिरवणुक टाळ मृदंग ब्यॉंड वादनासह श्रींचे द्वारकामाईंत चांदीचे नक्षीदार मखरांत श्रींचे फोटोची स्थापना ( अखंड नामगजर अध्याय वाचन ) दुपारीं ४ ते ६ पर्यंत समाधी मांदिरांत कीर्तन. रात्रौ कलाकारांचे गायन भजन वगैरे. दिनांक २८-९-६३ शनिवार रोजीं द्वारकामाईतील फोटोची पोथीची मिरवणुक व त्यानंतर श्रींचे समाधीस मंगलस्नान, वस्त्रार्पण, पुष्पार्पण, सामुदायीक ( भक्तांचे ) अभिषेक पूजन. १०॥ ते १२ पर्यंत श्रींचे समाधी मंदिरांत सं. गवई विठ्ठलराव मराठे यांचे साईपुण्यतिथी या आख्यानावर कीर्तन, माध्यान आरती, तीर्थप्रसाद, आराधना, विधी ९ ते १० पर्यंत भिक्षा मिरवणुक. गांवांतून सायंकाळीं ५ ते ६ वाजेपर्यंत सिमोल्लंघन मिरवणुक, मंत्रजागर. रात्रौ ९ ते ११ पर्यंत श्रींचे रथाची गांवांतून मिरवणूक. सुरसनई, चौघडा, ब्यॉंड वादन, ताशेवादन, टाळ मृदंग, भजनी दिंडीसह गारूडभारूड वगैरे. रात्रौ १० ते पहाटे ६ वाजेपर्यंत ( जागर ) कलाकारांच्या हजेऱ्या.

दिनांक २९-९-६३ रविवाररोजीं नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त दुपारीं ४ ते ६ पर्यंत सं. गवई विठ्ठलराव मराठे यांचे समाधी मंदिरांत कीर्तन. रात्रौ ९ ते ११ पर्यंत श्रींचे पालखीची गांवांतून मिरवणुक. दिनांक ३०-९-६३ सोमवार रोजीं नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त १०॥ ते १२ पर्यंत श्री. सं. गवई विठ्ठलराव मराठे यांचे गोपालकाला कीर्तन, दहीहंडी होऊन उत्सव समाप्त. उत्सवांत तीन दिवस श्रींचे जुने कापडाची

( प्रसाद ) म्हणून विक्री करण्यांत आली. उत्सवांत पहिले दिवशीं श्रीमती पार्वतीबाई ताम्हनकर, पुणे यांचे कीर्तन झालें. ( कलाकार ) श्रीपुढें गायन, वादन, नाट्यछटा, नकला, चोवीस कलाकारांनीं हजेरी दिली. त्यांना सं. तर्फे श्रीफळ व एक रुपया प्रत्येकीं ( आशीर्वाद प्रसाद ) म्हणून देण्यांत आला. कलाकारांत कुमार विश्वनाथ भोगले नांदेड ( मराठवाडा ) वय १३ या मुलांनें फारच उत्तम स्वतः तबला वाजवून गायन केलें व सर्व पशूंचे आवाज, नकला फारच उत्तम करून दाखविल्या. प्रेक्षक भक्तांनीं या मुलाला निराळीं बक्षिसें दिलीं व या मुलाची तारीफ केली.

उत्सवांत शिरापुरी, जिलबी, लाडू अशी तीन पक्वान्नें तीन दिवस केलीं होतीं. ( आराधनाविधी ) श्री. डॉ. गजाननराव दाभोळकर व त्यांच्या पत्नी, मुंबई या उभय-तांनीं केला. येणेंप्रमाणें उत्सव उत्तम रीतीनें पार पडला.

**ता. क.**—उत्सवांत संस्थान नोकरांना फराळ चहा तीन दिवस देण्यांत आला. उत्सवाचे शेवटीं साकोरी येथील कन्याकुमारी यांचें भजन झालें.

× × ×

## मुंबई कचेरींतील उत्सव

सालाबादप्रमाणें मुंबई ऑफिसांत दि. २८-९-६३ रोजीं रात्रौ ८ ते ११ पर्यंत भजनाचा कार्यक्रम झाला. श्रीसाईबाबांच्या पुण्यतिथी प्रीत्यर्थ बरीच भक्तमंडळी उपस्थित होती.

दिव्य दृष्टीसाठीं TELIGRAM :—DIVYANETRA

शिसा ऑप्टिशिअन्स (BOM. DADAR)



[ चष्म्यांचे व्यापारी ]

यांच्या येथें तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून

उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतात.

छबिलदास रोड, दादर (W. R.), मुंबई २८




## सप्टेंबर १९६३

चालू महिन्यात शिर्डीस गर्दी नेहमीप्रमाणें होती. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली ती खालीलप्रमाणें,

**कीर्तन :** श्री. ह. भ. प. भैरव अनंत काळे. मु. देऊळ ता. कोरेगांव जि. सातारा, श्रीमती पार्वतीबाई ताम्हनकर सदाशिव १९६ पुणें २, सं. गवई–विठ्ठलराव मराठे यांचीं दोन एकादशा उत्सवानिमित्त दोन अशी चार कीर्तनें झाली.

**गायन :** श्री. नागेश शंकर खळीकर, पुणें; कला संगम पार्टी पुणें; श्री. इनामदार, श्री. गणपतराव देवासकर, मुंबई; श्री. नरेश राजाराम लोंढे, पुणें; श्री. मधुकर भोसले, पुणें; श्री. यशवंत देशपांडे, पुणें; श्री. विष्णु शिवराम जोग, पुणें; श्री. आय. के. देशपांडे, नाशिक.

**भजन :** श्री. बिसन साधू, नागपूर; श्री. दत्तात्रय कृष्णराव चरडे, गोंदिया; श्री. गोपाळकृष्ण भागवत बंड, केडगांव; कुमारी वासंती जामगावकर, कुमारी सुमन गोंदकर, शिर्डी; श्री. रामचंद्र चव्हाण, सांगोला; श्री. धनसिंग पिल्ले, खडकी; श्री. वाय. चंदनकर, मुंबई; श्री. गजानन पवार, मुंबई; श्री. विश्वनाथ भोगले, नांदेड; श्री. ए. जी. शेख, नगर; श्री. नामदेव भोईर, पनवेल; श्री. विठ्ठल मांजरेकर, शिर्डी; श्री. एम. जी. कृष्ण, मुंबई; श्री. शंकर दिवेकर, पिंपळवाडी.

**हार्मोनियम, व्हायोलिन व तबला :** श्री. मो. रा. गंधे, शिर्डी; श्री. नरहर विष्णु गोखले, पुणें. श्री. साहेबराव जगन्नाथ पुली, ( एस. टी. नाशिक. ) श्री. मधुकर कुलकर्णी, पुणें; श्री. दत्तोबा गुरव, शिर्डी; श्री. श्रीपाद भागवत कुलकर्णी, सावळविहीर; श्री. शंकर राधू सालकर, कोपरगांव बेट.

**सनई व सुंदरीवादन :** श्री. नाना कोराटे, शिर्डी, श्री. सिद्राम जाधव ॲंड पार्टी, सोलापूर.

**नकला व नाट्यछटा :** सौ. नीला प्रभु, मुंबई व श्री. जगन्नाथ गोविंद कर्णीक, पुणें.

**नृत्य** . श्री. वसंत डॅान्सींगपार्टी पुणें; प्रो. वसंत बाबुराव गायकवाड. शिर्डी येथील हवापाणी उत्तम. रोगराई कांहीं नाहीं.

---

**Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi**

**श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ७-०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४-५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ३-७५ |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४-०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३-०० |
| (६) | Glimpes of Indian Spirituality | | by Pradhan | १-०० |
| (७) | Glimpes of Indian Spirituality | (Telgu) | | १-०० |
| (८) | श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २-०० |
| (९) | ,, | (हिंदी) | श्री. चिटणीस-दिल्ली | २-५० |
| (१०) | साईबाबा-अवतार व कार्य | (मराठी) | श्री. धोंड | २-०० |
| (११) | साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणू | ००-५० |
| (१२) | सगुणोपासना | (मराठी) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१३) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१४) | श्री रुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१५) | स्तवन-मंजरी | (मराठी) | श्री. दासगणू | ००-१३ |
| (१६) | श्री साई-सुमनांजली | (मराठी १०८ नांवें) | | ००-०६ |
| (१७) | कीर्तन पंचक | (मराठी) | श्री. देव | १-५० |
| (१८) | शीलधी | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१९) | श्री साईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (२०) | Spiritual Symphony | | by R. S. Harshid Mehta | २-५० |
| (२१) | Side lights on Sai Baba | (Eng.) | Calcutta | ००-७५ |
| (२२) | Guide to Shirdi | (English) | | ००-१२ |
| (२३) | स्तवनमंजिरी व सुमनांजली | (मराठी) | | ००-२० |

**Colour pictures of Sai Baba by Neroy**

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone 15" × 20" Thick | 1-00 |
| (2) | ,, ,, ,, 9½" × 13½" medium | 00-37 |
| (3) | ,, ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium | 00-50 |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 37 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा):

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.

2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.

मालक : श्री साईबाबा संस्थान, शिरडी, आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते. त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते!

★

आ णि म्ह णू न च

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स, ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई

टेलिफोन : ७५०४७

डी. डी. नेरॉय यांनी खास तयार केलेले श्री साईबाबांची तीन रंगी चित्रें, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ × ८, १० × १४, १४ × २० खालील ठिकाणी मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व

साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

मुद्रक : शा. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक : श्रीपाद बाळकृष्ण दर्प, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड,